बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार, दि.१०नोव्हेंबर २०२४ | वर्ष४रे | अंक९४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# जयभिम वाल्यांनो या दोघांना दारात सुद्धा उभे राहू देवू नका

## ३० वर्षात मुंदडाने किती दलितांना न्याय दिला?

## थापा मारुन तुम्हाला फसवतील आता फसू नका

## जोगवा मागण्यांसाठी आलेल्या दलालांना ओळखा?



## पृथ्वीराज साठे फक्त सांगकामे, त्यांना कनवळा नाही

## साठे, दलित प्रश्नावर कधीच रस्त्यावर उतरले नाहीत!

## काडीचाही फायदा नसलेली माणसे निवडून देता कशाला

### किती लोकांना पोटापाण्याला लावलं

केज मतदार संघात सत्तेला ढेकणासारख्या चिटकून बसलेल्या नमिता विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवीत आहेत असा डांगोरा पेटवताना दिसतात लोकप्रतिनिधी विकासाची कामे स्वतःच्या खिशातून कधीच करत नसतो, ही त्याची जबाबदारी आहे. प्रश्न हा आहे की, गेल्या प्रदीर्घ काळातील सत्तेत मुंदडा कुटुंबांनी किती दलितांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविला. दलितांच्या मुलांसाठी कोणते शैक्षणिक उपक्रम राबविले. त्यांना रोजगारांच्या संधी मिळवून दिल्या का? रमाई घरकुल आवास योजनेकरिता तुटपुंचा निधी दिला जातो, तो निधी वाढवून द्यावा यासाठी सभागृहात कधी आवाज उठविला का असे अनेक प्रश्न दिसून येतील.

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज राखीव मतदार संघात,भाजपकडून नमिता लोखंडे, राशपकडून पृथ्वीराज साठे निवडणूक रिंगणात उभा आहेत. या मतदार संघात दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी ही दोघेही पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. मुंदडा नावाचे कुटुंब तीस वर्ष सत्तेत राहूनही दलित मात्र आहे त्याच दरिद्री अवस्थेत आहे. पृथ्वीराज साठे हे सुद्धा केवळ सांगकामे व्यक्ती आहेत. त्यामुळे जयभीम वाल्यांनो नमिता आणि पृथ्वीराज या दोन्ही, अतिशय चतुर व्यक्तींना तुमच्या दारातही उभा राहू देऊ नका? कारण या दोघांचीही कारकीर्द दलितांना न्याय मिळवून देईल अशी नाही. अशा संतप्त लोकभावना मागासवर्गीय मतदार व्यक्त करु लागले आहेत. पान २ वर...

### १२ वर्षात काय दिवे लावले

पृथ्वीराज साठे राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून केजमध्ये उभा आहेत. गेल्या बारा वर्षात ते कुठे होते? निवडणुका आल्या की ते उगवतात आणि निवडणुका पार पडल्या की गायब होतात. या मधल्याकाळात दलितांची प्रश्न, त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार याचे पृथ्वीराज साठे यांना देणे घेणे नसते. अशा अनेक घटना सांगता येतील. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळात नेमकं काय घडले? हे अवघ्या राज्याला माहित आहे. अशी माणसे निवडून दिली तर समाजाच कल्याण होण्याऐवजी वाटोळच होईल असा सवाल केज मतदार संघातली जनता उपस्थित करू लागली आहे.

### केजमधील आतापर्यंतचे आमदार?

| उमेदवार | पक्ष | सन | मते |
|---|---|---|---|
| गोविंदराव गायकवाड | काँग्रेस | १९६२ | ११८४३ |
| सुंदरराव सोळंके | काँग्रेस | १९६७ | १९५२१ |
| बाबुराव आडसकर | काँग्रेस | १९७२ | ३८४१६ |
| भागूजी निवृत्ती सातपुते | अपक्ष | १९७८ | १९०१० |
| गंगाधर स्वामी | काँग्रेस (यु) | १९८० | ३०९३७ |
| भागूजी सातपुते | आयसीएस | २९८ | ९२९६७ |
| विमल मुंदडा | भाजप | १९९० | ३५९५७ |
| विमल मुंदडा | भाजप | १९९५ | ६७७३२ |
| विमल मुंदडा | राष्ट्रवादी | १९९९ | ८१३५४ |
| विमल मुंदडा | राष्ट्रवादी | २००४ | ८६७५० |
| विमल मुंदडा | राष्ट्रवादी | २००९ | ११०४५२ |
| पृथ्वीराज साठे | राष्ट्रवादी | २०१२ | ८५७५० |
| संगिता ठोंबरे | भाजप | २०१४ | १०६८३४ |
| नमिता मुंदडा | भाजप | २०१९ | १२३४३३ |

## सर्वच हिंदू मोदी समर्थक नाहीत

### देशविदेश: कॅनडाच्या पंतप्रधानांची टीका



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

कॅनडामध्ये खलिस्तानी कट्टरपंथी उपस्थित असून त्यांच्याकडून भारताला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप भारताकडून अनेकदा करण्यात आला होता. मात्र कॅनडाने हा दावा नेहमीच फेटाळून लावला. त्यानंतर आता पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी कॅनडाच्या भूमीत खलिस्तान्यांचा वावर असल्याचे कबूल केले आहे. कॅनडामध्ये खलिस्तानी आहेत, पण ते सर्व शीख समुदायाचे प्रतिनिधित्व करत नाहीत. तसेच कॅनडात पंतप्रधान मोदींचेही हिंदू समर्थक आहेत, पण ते सर्व हिंदू समाजाचे प्रतिनिधित्व करत नाहीत, असे पंतप्रधान ट्रुडो म्हणाले. दिवाळीनिमित्त आयोजित केलेल्या एका समारंभात बोलत असताना पंतप्रधान ट्रुडो म्हणाले की, खलिस्तान्यांचे अनेक समर्थक कॅनडात आहेत. पण ते सर्व शीख समाजाचे प्रतिनिधित्व करत नाहीत. तसेच कॅनडात पंतप्रधान नरेंद्र मोदींचेही समर्थक आहेत, तेही सर्व जण हिंदू समाजाचे प्रतिनिधित्व करत नाहीत.खलिस्तानी अतिरेकी हरदीपसिंग निज्जर यांच्या हत्येनंतर भारत आणि कॅनडात तणाव निर्माण झालेला आहे. त्या पार्श्वभूमीवर ट्रुडो यांचे विधान महत्त्वाचे मानले जाते. सप्टेंबर २०२३ मध्ये हरदीपसिंग निज्जरच्या हत्येमध्ये भारतीय गुप्तहेरांचा सहभाग असल्याचा आरोप पान २ वर...

## सुनेला टीव्ही पाहू न देणे ही क्रूरता?

### निर्णय: मुंबई उच्च न्यायालयातील खटला २० वर्षांनी निकाली

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २० वर्षांपूर्वीच्या घरगुती हिंचासाराच्या प्रकरणातील एका व्यक्तीसह त्याच्या कुटुंबाला दोषी ठरवणारा आदेश रद्द केला आहे. हा निर्णय देताना खंडपीठ म्हणाले की, मृत्यूमुखी पडलेल्या महिलेला सासरकडचे लोक सतत टोमणे मारायचे, टीव्ही पाहू द्यायचे नाहीत, मंदिरात एकटे जाऊ देत नव्हते आणि शेजाऱ्यांशी बोलूही देत नव्हते, असे आरोप आहेत. पण जे आरोप करण्यात आले आहेत, त्यामधील कोणतीही कृती गंभीर नसल्याने त्या क्रूरतेच्या व्याख्येमध्ये येत नाहीत.२० वर्षांपूर्वी सत्र न्यायालयाने आरोपी पती, त्याचे आई-वडील आणि भावाला भारतीय दंड संहिता कलम ४९८अ पान २ वर...

## फडणवीस यांचा एमआयएमला इशारा

### हल्लाबोल: म्हणाले, काहीही झालं तरी



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभांचा धडाका सुरु आहे. प्रचार सभांमधून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोपांने राजकारण तापलं आहे. या पार्श्वभूमीवर आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीच्या उमेदवारांसाठी जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्यावर हल्लाबोल केला. सुन लो ओवैसी, हे छत्रपती संभाजीनगर आहे, औरंगाबाद नाही, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी एमआयएमला दिला आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आज आपण एकत्र आलेलो आहोत. सुन लो ओवैसी हे छत्रपती संभाजीनगर आहे. आता कुणाचा बापही आला तरी छत्रपती संभाजीनगर हे नाव बदलू शकत नाही. काल एमआयएमची या ठिकाणी सभा झाली. त्या सभेमध्ये एक महिला म्हणाली की, छत्रपती संभाजीनगर नाव कसं झालं? त्यांना हे माहिती नाही की, छत्रपती शिवाजी महाराजांचा छावा आणि महापराक्रमी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज होते. ज्या छत्रपती संभाजी महाराजांना पडकण्यासाठी औरंगजेब संभाजीनगरमध्ये येऊन बसला. मात्र, ९ वर्ष छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेबाला झुलवत ठेवलं. एकही लढाई छत्रपती संभाजी महाराज हरले नाहीत. मात्र, फितुरी झाली नसती तर आमचे छत्रपती संभाजी महाराज कधीच औरंगजेबाच्या हातात आले नसते, अस पान २ वर...

## अॅड.प्रकाश आंबेडकर यांची भेट !

### चर्चेतले: प्रकुतीची केली विचारपूस



नगर/पुण्यभुमी प्रतिनिधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पुण्यातील शिवाजी नगर येथे प्रचाराला आले असता, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांची त्यांनी भेट घेतली व प्रकृतीची विचारपूस केली.

काही दिवसांपूर्वी ड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर अँजीओप्लास्टी झाली होती. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पुणे येथे पक्षाच्या उमेदवारांनाचा प्रचार सभेसाठी आले असता त्यांनी पुणे येथेली अँड प्रकाश आंबेडकर यांच्या पान २ वर...

**सभा** परळीमध्ये शरद पवार यांचा हल्लाबोल

## धनंजय मुंडेंच्या डोक्यात सत्तेची हवा

परळी पुण्यभूमी/ प्रतिनिधी

कृषी मंत्री धनंजय मुंडे यांना मी सर्व काही दिले मंत्री केले. परंतु त्यांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली. त्याचा परिणाम त्यांच्यावर झाला असे असे म्हणत तुम्ही राजेसाहेब देशमुख यांच्या पाठीशी राहा मी परळी मतदारसंघाचा विकास करतो असा शब्द राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी परळी येथे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत बोलताना परळी मतदार संघातील जनतेला दिला.



महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारात खासदार शरद पवार यांची परळीतील मोंढा मैदान येथे दिनांक ९ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजता जाहीर सभा संपन्न झाली. या सभेला खासदार रजनीताई पाटील, खासदार फौजिया खान, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, होळकर घराण्याचे वंशज राजे भूषण सिंग होळकर, महाराष्ट्रातील प्रसिद्ध कराळे मास्तर, फुलचंद राव कराड,सुदामातीताई गुट्टे ,राजाभाऊ फड, सुनील गुट्टे, काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर भाई, जीवनराव गोरे, राजेश देशमुख, मुक्ताराम गवळी, वसंत मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना खासदार शरद पवार म्हणाले की, परळीत आले आले की मला माझ्या जुन्या सहकाऱ्यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांनी माजी आमदार रघुनाथराव मुंडे, परळीच्या माजी नगराध्यक्ष राधाबाई बियाणी आदींचा उल्लेख केला. आपल्या भाषणामध्ये सुरुवात करताना त्यांनी सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्राला वीज देण्याचे काम या शहराने केले आहे. वीज निर्मिती केंद्र बंद पाडण्यात आले. त्यामुळे अनेकांच्या हातचा रोजगार बुडाला.

कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या विषयी बोलताना ते म्हणाले की, धनंजय मुंडे यांना मी जे जे करता येईल ते त्यांच्यासाठी केले. पक्षप्रवेश करून घेतला. विधान परिषदेचे सदस्य केले. विरोधी पक्षनेता पद दिले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी पान २ वर...

## BHIM UPI चं नाव बाबासाहेबांच्या नावावर

### चर्चेतले: मोदींचा दावा ठाकरेंच्या शिवसेनेने खोडून काढला?



अकोला/पुण्यभूमी प्रतिनिधी

अकोला येथील प्रचारसभेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दावा केला आहे की आपल्या देशात मोबाइलद्वारे पैशांची देवाणघेवाण करण्यासाठी सुरू केलेल्या प्रणालीला म्हणजेच यूपीआय (युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस) प्रणालीला आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावानेच भीम यूपीआय (इक्खच् णझख) असं नाव दिलं आहे. मात्र मोदी यांचा हा दावा शिवसेनेने (ठाकरे) खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. शिवसेनेचे (ठाकरे) विधान परिषद सदस्य व विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे की भीम यूपीआयच्या संकेतस्थळावरून कुठेही सांगितलेलं नाही की या नावाचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा काही संबंध आहे. नरेंद्र मोदी म्हणाले, जगाने नव्या डिजीटल चलनाचा स्वीकार केला आहे. पूर्वी जग चामड्याच्या नोटा वापरत होतं. फार पूर्वीच्या काळात दगडाची नाणी व चलनाचा वापर केला जात होता. त्यानंतरच्या काळात तांब्यासह वेगवेगळ्या धातूंची नाणी पान २ वर...

## ‘तो’ आणि ‘त्या’!

बाकी काही नाही तरी डोनाल्ड ट्रम्प यांना एका कृत्याचे श्रेय देण्यास पुरोगाम्यांचाही विरोध राहणार नाही. ते म्हणजे ‘ग्लास सीलिंग’ला तडा जाऊ न देणे. हे ‘काचेचे छत’ भेदू पाहणाऱ्या कमला हॅरिस यांना या वेळी आणि हिलरी क्लिंटन यांना २०१६ साली पराभूत करून ते अभेद्या राखणे, हे कर्तृत्व ट्रम्प यांचेच. त्यासाठी या भूतलावरील समग्र पुरुष त्यांचे ऋणी राहतील. महिलांना संधी असल्याचा देखावा करणारे, पण प्रत्यक्षात त्यांना घुसमटवणारे हे ‘काचेचे छत’ भेदून कमला हॅरिस अध्यक्षपदी विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला ठरतील का, याची उत्सुकता जगाला होती. ट्रम्प यांच्याचकडून पराभूत झाल्यानंतर हिलरी क्लिंटन यांनी ‘आम्ही लवकरच हे ग्लास सीलिंग भेदू,’ असा आत्मविश्वास व्यक्त केला होता. पण ते याही वेळी अभेद्याच राहिले. महासत्ता म्हणवणारी अमेरिका, महिलांना सर्वोच्च स्थान देण्याबाबत मात्र तिच्यापेक्षा कित्येक पटींनी अविकसित देशांपेक्षाही मागास असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले.महासत्ता’ म्हणवण्याची हौस मुळात पुरुषी, त्यातून यंदा अमेरिकी जनतेने अशा दुकलीला निवडून दिले, जी ‘हिला निवडून दिलेत, तर जग तिला खेळवत राहील’, ‘ज्यांना मुलेबाळे नाहीत त्या बायका देश काय सांभाळणार’ असली पुरुषी अहंकाराचा दर्प असलेली वक्तव्ये करण्याबद्दल ओळखली जाते. ट्रम्प यांनी हिलरी क्लिंटन यांना हरवले, तेव्हा हिलरींच्या थेट मतांची टक्केवारी ट्रम्प यांच्यापेक्षा अधिक होती, पण ‘इलेक्टरल कॉलेज’ची मते मात्र ट्रम्प यांना अधिक मिळाली. ट्रम्प २०२० मध्ये हरले, ते पुरुष आणि श्वेतवर्णीय जो बायडेन यांच्याकडून. या वेळी पुन्हा त्यांच्यासमोर स्त्री प्रतिस्पर्धी उभी ठाकली, तीदेखील श्वेतवर्णीय नसलेली, पण अमेरिकी नागरिकांनी तिला मत देण्याऐवजी एका दोषसिद्ध पुरुषावर विश्वास ठेवला. अमेरिकेच्या इतिहासात हे प्रथमच घडले. सत्तापालटावेळी २०२१ साली ट्रम्प यांनी समर्थकांकरवी घातलेला धुडगूस, त्यातून लोकशाहीचाच झालेला अवमान, कोविडकाळातील त्यांच्या प्रतिगामी भूमिका, सारे काही क्षम्य ठरले. अमेरिकेसारख्या स्वत:ला उदारमतवादी व्यक्तिस्वातंत्र्यवादी म्हणवणाऱ्या देशाने ट्रम्प यांच्यासारखा उद्दाम आणि वर्चस्ववादी पर्याय स्वीकारला– कारण या महासत्तेतल्या बहुसंख्य मतदारांची स्त्रीविषयक आणि वर्णविषयक मानसिकता! काळाच्या प्रत्येक टप्प्यावर या खुज्या मानसिकतेचे दर्शन महासत्ता घडवत आली. जगातली सर्वांत जुनी लोकशाही म्हणविणाऱ्या या देशात महिलांना साधा मतदानाचा अधिकार मिळवण्यासाठीही लढा उभारावा लागला. सेनेटमध्ये तर सुरुवातीची तब्बल १३० वर्षे एकही महिला नव्हती. ही प्रथा मोडली रिबेका फेल्टन यांच्या एका दिवसापुरत्या ‘नियुक्ती’मुळे. या फेल्टनबाई श्वेतवर्णीय वर्चस्ववादी आणि स्वत: गुलाम बाळगणाऱ्याच होत्या. अमेरिकी राजकीय पटलावर काही प्रमाणात महिला दिसू लागण्यासाठी दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ उजाडावा लागला.संधींची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देशाने जगभरातील वैविध्य स्वत:त सामावून घेतले, पुढे जाऊ पाहणाऱ्याला वाट करून दिली. पण पुढे म्हणजे किती पुढे याच्या महिलांसाठी खास मर्यादा तिथेही आहेत. मधल्या काळात युरोप, आशिया, आखाती देश, एवढेच काय आफ्रिकेतल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल देशांतदेखील सर्वोच्च पदी महिला विराजमान झाल्या. मुस्लीमबहुल देशांतही घराणेशाहीतून का असेना, पण सर्वोच्च पद महिलांनी कधी ना कधी भूषविले. यापैकी काहींनी ऐतिहासिक कामगिरीही केली, पण अमेरिकेत मात्र हे पद अद्याप महिलांसाठी निषिद्धच राहिले आहे. ‘एवढ्या मोठ्या देशाचा कारभार महिला हाकू शकत नाही’ हा पुरुषी अहंकारातून झालेला प्रचार अमेरिकी मतदारांना पटला! पुतिन आणि क्षी जिनपिंग यांच्यासमोर तिचा कसा निभाव लागणार, युद्ध करण्याची वा थांबवण्याची क्षमता तिच्यात असेल का, अशा शंका उपस्थित केल्या गेल्या. शहरी आणि ग्रामीण मानसिकतेत केवळ विकसनशील देशांतच तफावत दिसते असे नाही, अमेरिकेत हे अंतर प्रकर्षाने जाणवते. ग्रामीण अमेरिकेने ट्रम्प यांना बळ दिले. या देशाचे नेतृत्व महिला करू शकत नाही यावर ग्रामीण अमेरिकी मतदार ठाम राहिल्याचे दिसले.

# जातीपातीच्या पुढे जाऊन मत करेल?

महाराष्ट्राच्या राजकारणात अल्पावधीतच लोकप्रिय चेहरा तो काही असाच होत नाही.त्यामागे मोठा संघर्ष असतो. राजकीय वारसा पिढीने मिळाला असला तरी स्वतः सिध्द झाल्याशिवाय जनता सहजासहजी स्वीकारत नाही.ही काळ्या दगडावरची पांढरी रेष.या संघर्षातून स्वतः ला सिध्द केलेलं आणि महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतः च वलय निर्माण करणारं परळीच्या आणि बीडच्या किंबहुना महाराष्ट्राच्या राजकारणाला लाभलं आहे. सध्या विधानसभा निवडणूक रणधुमाळीचा बिगूल जोर धरला आहे. त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांचा आणि उमेदवारांचा कस लागलाय. पण,कधी नव्हे ते मतदारांचाही कस लागलाय. कारण, लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात विकासावरती निवडणूक व्हायला हवी होती पण ती दिसली नाही.तोच कित्ता याही म्हणजे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गिरवला जाणार हे निश्चित झाल्याच मतदारांच्या बोलण्यातून आणि गावागावांतील पार, चौकातून चर्चिला जातो आहे.हे चित्र जवळजवळ सर्व मतदारसंघात म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. मुंबईतील ३६ मतदारसंघात थोडाफार फरक किंवा अपवाद असेल.यात दूमत असू शकतं. निवडणूक ही विकासाच्या मुद्यावर व्हावी?असा सवालही कुणी करतांना दिसत नाही. आजी –माजी लोकप्रतिनिधींनी कांहीच मतदार संघात विकास केला नाही?असा सवाल व्हायला हवा.तसा सवाल कुठेच ऐकू येत नाही. पिढ्यानपिढ्या प्रस्थापित समाजाने कोणावर तरी अन्याय करून गुलाम बनवले आणि ती गुलामगिरी प्रत्येक समाजातून नष्ट करण्यासाठी अनेकांनी आपापल्या समाजात विचार परिवर्तन केले.



तेव्हा कुठे समाजासमाजात ऐकोपा वाढला आणि त्यास कायद्याचाही धाक राहिला. आज पुन्हा जातीचा संघर्ष पेटू पाहतोय आणि समाजा–समाजातील एकोपा दूरावला जातोय.त्याचा परिणाम आज खोलवर रुजू लागलाय. देशात किंवा महाराष्ट्रात राजकारण आज होत आहे असे नाही.पण,कधी जातीकड पाहून आजवर कुणी मतदारांनी कौल दिलेला नाही.हे तितकेच खरे. विकासाची दृष्टी असलेल्या लोकप्रतिनिधींना जनतेने सभागृहात पाठवले आहे.आता लोकप्रतिनिधींचा प्रामाणिकपणा हा त्या लोकप्रतिनिधींकडे ! याला मतदार पुन्हा जागा दाखवू शकतील.हा मुद्दा पुढे करून कोणी मतदान करत असेल तर तो आज सापडणेही अशक्य. आज जातीचा संघर्ष पेटू पाहत असल्याने लोकप्रतिनिधी निवडून आणण्यातही जात हाच निकष ठरवला जातो आहे.हे विष नेमके राजकारणात उतरते कसे?हा प्रश्न.

संविधानाने प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलं आहे. पण,त्याचा स्वैराचार होतो आहे का?याचेही भान अभिव्यक्त होताना ठेवले गेले तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येकाला अभिव्यक्त होण्यास अनुकूल होईल.अन्यथा नेत्याची एकमेकांवरची टिका अगदी बिघडून गेली आहे. असो, आजवर ओबीसींनी मराठा उमेदवार निवडून दिले, मराठ्यांनी ओबीसी निवडून दिले , अनुसूचित जाती –जमाती उमेदवार ओबीसी मराठा बांधवांनी निवडून दिले , अल्पसंख्याक मतदारांनी कधीच लोकप्रतिनिधी ची अपेक्षा न ठेवता सर्व समाजाच्या उमेदवारांना निवडून दिले.हे का, कशासाठी?हा जातीय सलोखा डिजिटल जमान्यात मान्यता देत नाही? महाराष्ट्रात जात कधीच निवडणुकीत मुद्दा झालेली नव्हती.हे खूळ नेमकं आलं कस?आपण पुन्हा जाती–पातीत अडकतोय ?परळी विधानसभा मतदारसंघात उमेदवार ठरण्यापासून राज्याचं लक्ष लागून आहे.एका उमद्या ओबीसी नेत्याला,जो भविष्यात मुख्यमंत्री होण्याची



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

पावलं असताना त्याला चक्रव्यूहात अडकविण्यासाठी अमूक पक्षाची सगळी यंत्रणा काम करते.ही बाब परळी विधानसभेतील मतदारांच्या लक्षात येणार नाही का? राज्याच्या आश्वासक नेत्याला अडविण्यासाठी काही विकासात्मक कामं केली नाहीत? यावर अडवणूक करणं शक्य नसल्याचं विरोधकांच्या लक्षात येताच.या निवडणुकीला वेगळं वळण देण्याच काम लोकसभेच्या निवडणुकीपासून सुरू होत.हे वेगळं सांगण्याची गरज नाही. पण,परळी विधानसभा मतदारसंघातील जनतेला विकासाचा लोकप्रतिनिधी २०१९ ला गवसला आणि विकासाची दूरदृष्टी धनंजय मुंडे यांच्यात दिसली. जनता तितकी दूधखुळी नक्कीच नाही.जो परळीचा चेहरा भविष्याचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा आहे तो विकासाभिमुख आणि आश्वासक चेहरा जो प्रत्येक राजकीय पक्षाला हवा आहे. परळी मतदारसंघातील असं एकही गावं,वाडी, तांडा नाही जिथं कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या फंडातून काही काम झाले नसेल. विविध समाजासाठी सभागृह, सिमेंट बंधारे, सिमेंट रस्ता, समाज मंदिर , पिण्याच्या पाण्यासाठी निधी दिला.यात अमूक अमूक जातीचा उल्लेख कुठेही नाही. एखादा समाज उघड उघड विरोध करूनही त्यांनी कधी अमूक समाजाचा म्हणून निधी अडवला नाही.ते करता आले नसते का?हा प्रश्न.राज्याच लक्ष असलेल्या या संवेदनशील मतदारसंघातील विद्यमान आमदार मंत्री धनंजय मुंडे यांच्यासाठी एवढी यंत्रणा डोळे लावून आहे यावरून ना.धनंजय मुंडे यांच राजकीय वलय आणि राजकीय स्थान काय असेल याची कल्पना नक्कीच मतदारांना आली असेल.परळी मतदारसंघातील सजग , सदसद्विवेकबुद्धी असलेला मतदार जातीपातीच्या पुढे जाऊन भविष्यातील मुख्यमंत्री पदाचा चेहरा म्हणून परळीला पुढे करतील? हे पहाणे औत्सुक्याचे ठरेल!

## पान एक वरून

**जयभिम वाल्यांनो या दोघांना...**केज मतदार संघात बौद्धांवर नेहमीच अन्याय झालेला आहे.कारण कोणताही पक्ष उमेदवारी देत असताना बौद्धांना जाणीवपूर्वक दावले गेले आहे. त्यामुळे बौद्ध समाजाने ही बाब अतिशय गंभीरतेने लक्षात घेऊन भाजपच्या नमिता आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पृथ्वीराज या दोघांनाही त्यांची जागा दाखवून द्यावी. तरच त्यांचे डोके ठिकाणावर येईल. केज मतदार संघात १९७८ साली भागुजी निवृत्ती सातपुते अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आले होते. त्याची पुनरावृत्ती यंदाच्या निवडणुकीत, होणे अपेक्षित आहे. कारण एकाच कुटुंबाला अजून किती वर्ष पोसणार आहात? पुन्हा पुन्हा तेच पक्ष आणि तीच माणसं तुमच्यासमोर निवडणुकीत उभा राहत आहेत. त्याला देखील आता थांबा लागला पाहिजे. तरच केज मतदार संघात नवनिर्माण झाले असे म्हणता येईल. जोपर्यंत चिटकून बसलेली जळमट फेकून देणार नाहीत, तोपर्यंत तुमचे कल्याण होणार नाही. असा आवाज युवकांमधून उमटतो आहे.

**सर्वच हिंदू मोदी समर्थक...**ट्रुडो यांनी केला होता. त्यानंतर भारत आणि कॅनडामध्ये तणावाचे संबंध निर्माण होत गेले.भारताने निज्झरला दहशतवादी घोषित करून त्याच्या अटकेची मागणी केली होती. १८ जून २०२३ रोजी ब्रिटिश कोलंबिया येथील एका गुरुद्वाराबाहेर निज्झरची हत्या करण्यात आली होती.मागच्या महिन्यात कॅनडाने निज्झरच्या हत्येची चौकशी करत असताना भारतीय उच्चायुक्तांवर ठपका ठेवला. उच्चायुक्तांना निज्झरच्या हत्येत रस होता, असा आरोप कॅनडाने केल्यामुळे भारताने नाराजी व्यक्त केली. तसेच आपले सर्व राजनैतिक अधिकारी कॅनडातून माघारी बोलविण्यात आले. तसेच कॅनडाच्या सहा राजनैतिक अधिकाऱ्यांनाही देशाबाहेर काढण्यात आले.भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने वारंवार सांगितले की, कॅनडाच्या सरकारने निज्झरच्या हत्येमध्ये भारताच्या सहभागाबद्दलचे पुरावे दिलेले नाहीत. ट्रुडो हे आगामी निवडणुकीसाठी मतपेटीचे राजकारण करत असल्याचाही त्यांच्यावर आरोप होत आहे. त्यामुळेच ते कॅनडाच्या भूमीवरील फुटीरतावादी घटकांचा सामना करण्यास अपयशी टरत आहेत, अशीही टीका त्यांच्यावर होत आहे.

**सुनेला टीव्ही पाहू न देणे ही...**तसेच ३०६ (आत्महत्येला प्रवृत्त करणे) या प्रकरणी दोषी ठरवले होते. त्यानंतर आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. आता सुमारे २० वर्षांनी औरंगाबाद खंडपीठाने सत्र न्यायालयाचा आरोपींना दोषी ठरवणारा निर्णय रद्द केला आहे.न्यायमूर्ती अभय एस वाघवसे यांच्या एक सदस्यीय खंडपीठाने १७ ऑक्टोबर रोजी दिलेल्या आदेशात नमूद केले आहे की, अपीलकर्त्यांवर मृत पीडितेने बनवलेल्या जेवणाची खिल्ली उडवणे, तिला टीव्ही पाहू न देणे, शेजाऱ्यांशी बालू न देणे, मंदिरात एकटीला जाऊ न देणे आणि मध्यरात्री पाणी भरण्यास भाग पाडणे यासारखे आरोप आहेत. फिर्यादींनी दिलेल्या माहितीनुसार पीडित मृत महिला आणि अपीलकर्त्याचा विवाह २४ डिसेंबर २००२ रोजी झाला होता. फिर्यादींचा असा आरोप होता की, विवाहानंतर पती आणि सासरच्या लोकांनी पीडितेला वाईट वागणूक दिली, तिच्यावर अत्याचार केले आणि तिचा छळ केला. या सर्व त्रासाला कंटाळून पीडितेने आपले जीवन संपवले.दरम्यान न्यायाधीशांना संबंधित प्रकरणातील साक्षीदारांच्या साक्षीवरून असे लक्षात आले की, ज्या गावात मृत पीडिता आणि तिचे सासरचे लोक राहायचे त्या गावात पाणीपुरवठा हा सहसा मध्यरात्री व्हायचा त्यामुळे गावातील सर्वांनाच मध्यरात्री पाणी भरावे लागायचे. यावेळी खंडपीठाने भारतीय दंड संहिता कलम ४९८अ वर निकाली निघालेल्या खटल्यांचा दाखला देत असे निरीक्षण नोंदवले की, पती आणि त्याच्या कुटुंबावर केलेले आरोप कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा ठरणार नाहीत.

**फडणवीस यांचा एमआयएमला...**देवेंद्र फडणवीस म्हणाले.औरंगजेबाचं नाव या शहराला कधीच राहू नये, म्हणून आपल्या महायुतीच्या सरकारने या शहराला छत्रपती संभाजीनगर हे नाव दिलं आहे. पण ज्यांचे मनसुबे रझाकारांचे राज्य आणण्याचे आहे. त्यांना मी सांगतो की आम्ही जागे झालो आहोत. ही निवडणूक एकजूट दाखवण्याची आहे. आपण धर्मयुद्ध करू. देव, देश आणि धर्म काय आहे? हे संभाजीनगरकरांनी दाखवून द्यायला हवं, असंही देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.आता या ठिकाणी ‘व्होट जिहाद’ सुरु झालेला आहे. आपण सर्वांनी पाहिलं लोकसभेच्या निवडणुकीमध्ये पाच लोकसभा मतदारसंघात एक लाख ९० हजार मतांनी आपण पुढे होतो. मात्र, फक्त चार हजार मतांनी आपले उमेदवार पराभूत झाले. लोकसभेच्या निवडणुकीत व्होट जिहाद हे आपल्या अनेक मतदारसंघात पराभवाचं कारण राहिलं. काही लोकांनी भगव्या बद्दल गद्दारी केली. काही लोकांनी मतांची लाचारी केली, असा हल्लाबोल देवेंद्र फडणवीस यांनी केला.

**ॲड.प्रकाश आंबेडकर...**निवासस्थानी जाऊन त्यांना सदिच्छा भेट घेऊन त्यांचा प्रकृतीचे विचारपूस केली अँड प्रकाश आंबेडकर यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून डॉक्टरांनी त्यांना आरामा करण्याचा सल्ला दिला आहे त्या पार्श्वभूमीवर राज्यातील अनेक नेत्यांनी अँड प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन त्यांचा प्रकृतीचे विचारपूस केली आहे.

**धनंजय मुंडेंच्या डोक्यात** ...दिली आणि निवडून आल्यानंतर मंत्री केले. परंतु त्यांच्या डोक्यात सत्तेची हवा गेली. त्यामुळे त्यांच्यावर परिणाम झाला असावा असे म्हणत त्यांनी शरद पवार यांना सोडल्याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मल्हारराव होळकर घराण्याचे वंशज राजे भूषण सिंग होळकर म्हणाले की, महायुती सरकारने महाराष्ट्रातील धनगर समाजाचे दिशाभूल केली आहे. धनंजय मुंडे यांच्याशी बोलताना ते म्हणाले की, ज्यांनी घडविले त्यांनाच इथल्या उमेदवाराने सोडून दिले. खासदार फौजिया खान म्हणाल्या की,महाराष्ट्र संतापलेला आपल्याला दिसतोय. महिलांचे हक्क महिलांना कधी मिळणार. तर सोयाबीनचा भाव वाढण्याऐवजी आज प्रचंड घटलेला दिसतोय त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे खासदार रजनीताई पाटील यांनी सांगितले. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी बीड जिल्हा हा शरद पवार साहेबांवर प्रेम करणारा जिल्हा आहे. त्यामुळे समोरच्या नेत्यांनी इमोशनल ड्रामा करू नये असे आवाहन केले. याप्रसंगी परळी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी परळीकरांसमोर नतमस्तक होत आजची सभा म्हणजे समोरच्या उमेदवारांची झोप उडवणारी असल्याचे म्हणाले. दुपारी दीड वाजता असणारी शरद पवार यांची सभा तब्बल दोन तास उशिराने सुरू झाली. तरीही सभेला विधानसभा मतदारसंघातील महिला पुरुषांची व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांची हजारोंच्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या आजच्या या सभेत भाजपाचे किसान मोर्चाचे राज्याचे उपाध्यक्ष उत्तम माने त्यांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटामध्ये पवार साहेबांच्या उपस्थितीत त्यांनी जाहीर प्रवेश केला.

**BHIM UPI चं नाव बाबासाहेबांच्या**

अस्तित्वात आली. त्यानंतर कागदी चलन अस्तित्वात आलं. चलनामध्ये सातत्याने बदल होत गेले. आज जगभरात डिजिटल चलनव्यवस्था आहे. आपल्या देशाने यूपीआय (णपळषळश्रव झरूशपीं खपींशीषरलश) या डिजीटल चलनव्यवस्थेचा अवलंब केला आहे. यूपीआय हा डिजिटल चलनव्यवस्थेतील एक प्रकार आहे. याद्वारे आपण सर्वजण मोबाईलद्वारे पैशांची देवाण–घेवाण करू लागलो आहोत.

**मोदींचा दावा काय?** : पंतप्रधान मोदी यांनी सभेला उपस्थित लोकांना विचारलं की तुम्हाला माहिती आहे का आपण या डिजिटल चलनाचे नाव काय ठेवलं आहे? हा मोदी आहे या मोदीची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर श्रद्धा आहे. म्हणूनच आम्ही या चलनाला भीम यूपीआय असं नाव दिलं आहे. जेणेकरून भविष्यात जेव्हा संपूर्ण देश या डिजिटल चलनाचा, डिजिटल ट्रान्जॅक्शनचा वापर करू लागेल किंवा प्रत्येक जण भीम यूपीआयचा वापर करत असेल, तेव्हा प्रत्येकाला बाबासाहेब आंबेडकरांची आठण येईल. प्रत्येकाला जाणीव होईल की हे काम नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.

## पान सहा वरून

**राजेभाऊ तू काळजी**

नेतृत्वाची आजच्या समाजाला गरज आहे. काम करत रहा ही जनता जनार्दन तुम्हाला नक्कीच एका मोठ्या उंचीवर नेऊन ठेवेल. निष्ठेला आणि कामाला निश्चित फळ मिळत असते. तुम्ही लोकांच्यासाठी संघर्ष करत रहा, लोकसेवा करत रहा मी तुमच्या पाठीशी मोठी ताकद लावणार आहे. भविष्यात लवकरच तुमच्यावर एक मोठी जबाबदारी मी टाकून लोकांच्या सेवेसाठी तुम्हाला मी मैदानात उतरवणार आहे. साहेबांच्या या शब्दांमुळे मला आता कसलीही काळजी उरलेली नसून मी त्यांचा विचार तळागाळातील जनतेपर्यंत नेण्यासाठी सदैव कार्यरत राहीन असे राजेभाऊ फड मध्यम प्रतिनिधींशी बोलतांना म्हणाले.

**शाळा प्रवेश दिन उपक्रमाने**

वेळ व योग्य ती मदत करण्याचा निश्चय केला. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण झाला पाहिजे व त्यानुसार अंधश्रध्देपासून दुर रहाणे कसे हिताचे आहे हे विद्यार्थ्यांना व पालकांना बौध्द महासभेचे शहराध्यक्ष ॲड.केतन गायकवाड यांनी स्पष्ट केले. शाळा प्रवेश दिनाचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप तर्फे २६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही–पेन) वाटप करण्यात आले व पुढील शिक्षणाकरीता शुभेच्छा दिल्या. ‘वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयातर्फे’ प्रातिनिधीक स्वरुपात जान्हवी वाघमारे, प्रिती जाधव, समृध्दी सोनवणे, विश्वास शिंदे, निशांत वडमारे व अंजली विशाल वडमारे या विद्यार्थ्यांचा आणि बालिका आधीरा निळकंठ वाघमारे हिने बोबड्या भाषेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शाळा प्रवेश दिनाबद्दल माहिती दिली म्हणून या सर्वांना सावित्रीमाई फुले यांचे जीवन चरित्र पुस्तके देवून सत्कार करण्यात आला. तर ६ ज्येष्ठ महिलांनी विजुबाई अंकुटे, कमलबाई अंकुटे, संगमित्रा गायकवाड, शकुंतलाताई ससाणे, जयश्री वडमारे, संगीताबाई जाधव यांनी अनेक हाल–आपेष्ट सहन करुन आपल्या पाल्यास उच्च शिक्षणाची कास धरावयास लावली या बद्दल त्या सर्वांना महापुरुषांची जीवन चरित्र पुस्तके, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे संदीपान निर्मळ यांची स्व:लिखित ‘राजगृह’ कविता संग्रह व डी.एम. राऊत यांनी बुध्द आणि त्यांचा धम्म हा ग्रंथ विहाराकरीता भेट दिला. लहानपणीच वाचनाची गोडी लागावी म्हणून वाचन संस्कृती वाढविण्याकरीता फिरते वाचनालयातर्फे ५० पुस्तकांचा संच परिसरातील विद्यार्थ्यांकरीता ॲड.तेजस वडमारे यांना मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. पुस्तक वितरणाची जबाबदारी त्यांनी स्वयंस्फुर्त स्विकारली. अध्यक्षीय समारोपात अध्यक्ष महोदयांनी बदलत्या शिक्षण प्रणाली मध्ये होत असलेल्या बदला बद्दल पालकांनी व विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी या बद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास पुण्यभूमीचे सुनील डोंगरे, सिध्दार्थ सूर्यवंशी, से.नि. केंद्र प्रमुख औसरमोल ए.एल., अमरसिंह ढाका, मीना आंकुटे, अर्चना जाधव, अंजली वडमारे, जयश्री गवळी, शिवकन्या खरमाडे, कोमल वाघमारे, आशा भालेराव व परिसरातील बहुसंख्य विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता ॲड. केतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेम जोगदंड, राज जाधव, यश गवळी यांनी बहुमोल परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना वाचनालयातर्फे अल्पोपहार देवून सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

**चांगल्या कामाची दखल**

विधानसभेतही तुतारीची ललकारी देऊन विरोधकांना आसमान दाखवू हा विश्वास व्यक्त करतो.त्यासोबतच भविष्यात आपले कष्ट आणि निष्ठा निरर्थक जाऊ नये याची पक्षाच्यावतीने योग्य ती खबरदारी घेण्यात येईल, पुन्हा एकदा विधानसभेला इच्छुक उमेद्वारी अर्जातून दिलेल्या प्रतिसादा बद्दल आपल्या सर्वांचे आभार मानतो.आपला कृतज्ञ,शरद पवार असे पत्र नुकतेच गुट्टे यांना प्राप्त झाले असून खा.शरदचंद्रजी पवार साहेबांच्या पत्राने आम्हाला पक्ष कार्यासाठी अधिक आशीर्वाद व बळ मिळाले आहे.यापुढे याच जोमाने पक्ष आदेश मानुन महाविकास आघाडीच्या परळी विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांना प्रचंड मताधिक्य मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे व त्यांचे पुत्र युवानेते सुनील गुट्टे यांनी यावेळी सांगितले.

**पुणे निवडणूक विभाग**

समितीमधील सर्व सदस्य, काही उमेदवार व सर्व १९ उमेदवारांचे खर्च प्रतिनिधी उपस्थित होते. मा. खर्च पर्यवेक्षक उमेश कुमार (आय.आर.एस.)–(सी अँड सी.इ.) यांनी उमेदवारांच्या खर्चाबाबत मार्गदर्शक सूचना केल्या. उपस्थित सर्व उमेदवार व सर्व १९ उमेदवारांचे खर्च प्रतिनिधी यांनी तपसणी प्रक्रियेस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच प्रश्न विचारून आपल्या शंकाचे निरसन करून घेतले. मा. खर्च पर्यवेक्षक यांनी तेवढ्याच उस्फुर्तपणे उमेदवार व सर्व १९ उमेदवारांचे खर्च प्रतिनिधी यांच्या प्रश्नांचे समाधान केले. यावेळी मा. खर्च पर्यवेक्षक श्री.उमेश कुमार (आय.आर.एस.)–(सी अँड सी.इ.) यांनी उपस्थित सर्व उमेदवार व सर्व १९ उमेदवारांचे खर्च प्रतिनिधी यांना निवडणूक खर्चाबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ७७६८०३६२३० वर संपर्क साधून अथवा मेसेज किंवा व्होट्स ॲप मेसेजद्वारे कळविणेबाबत सूचना केल्या आहेत. सर्व उमेदवारांच्या निवडणूक विषयांच्या खर्चाची दुसरी तपासणी दि. १३ नोव्हेंबर २०२४ रोजी तर तिसरी तपासणी १७ नोव्हेंबर २०२४ रोजी होईल. सदर दोन्हीही दिवशी सर्व १९ उमेदवार व त्यांचे खर्च प्रतिनिधी यांना निवडणूक कार्यालयात उपस्थित राहणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

**निवडणूक कामाचा**

आयएएस अधिकारी अर्पिता ठुबे, निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, स्वीपचे नोडल अधिकारी ओमकार देशमुख, प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, तहसीलदार अविनाश शिंगटे, माध्यम कक्षातील सहायक कक्ष प्रमुख् राजश्री आचार्य, इंग्रजीच्या प्रोफेसर डॉ. संगीता ससाणे, हिंदीचे प्राध्यापक डॉ. राजेंद्र सोनवणे, उर्दूचे अनुवादक शेख मोहम्मद काजिमोद्दीन यांच्यासह माध्यम कक्षातील सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

**माजलगावमध्ये वंचितची**

एसटी मुस्लिम ओबीसी समुदायावर हल्ले करण्याचा प्रयत्न चालू आहे आणि हे हल्ले रोखण्यासाठी सर्व समाज बांधवांनी एकत्रित येऊन आपल्या हक्काचे प्रतिनिधी निवडून देणे गरजेचे आहे. या अनुषंगाने ही सभा अत्यंत महत्त्वदायी आहे आणि या सभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक सभेचे साक्षीदार व्हावे व शेख मंजूर यांना मतदार रुपी आशिर्वाद द्यावेत.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# जीवनदायिनी झाली गटारगंगा

## इंद्रायणीच्या प्रदूषणाने नैसर्गिक जलस्रोत दूषित

## इंद्रायणी नदी लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान



वृत्तसंस्था

**पुणे :** इंद्रायणी नदीतील सांडपाणी, रसायनमिश्रित व दूषित पाण्याची नदीपात्राबरोबरच परिसरातील गावांनाही बाधा पोहचू लागली आहे. कुरुळी, मोई, चिंबळी, निघोजे आदी परिसरातील पाण्याचे स्रोत दूषित झाले असून, ग्रामस्थांबरोबरच शेतीचे आरोग्यही धोक्यात आले आहे. इंद्रायणी नदी ही लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असून, एकेकाळी खेड-हवेली तालुक्याची जीवनदायिनी म्हणून ओळखली जात होती.

मात्र, हीच जीवनदायिनी सध्या गटारगंगा झाली आहे. नदीपात्रातील प्रदूषणामुळे जलचर नाहीसे झाले आहेत. नदीसुधार प्रकल्पाची चर्चा वेळोवेळी होते. मात्र, यावर ठोस अशी उपाययोजना केली जात नाही. नदीपात्र स्वच्छ व सुंदर असावे अशी कल्पना या भागातील लोकप्रतिनिधींसह पालिका अधिकारी मांडतात. मात्र, कोणीही लक्ष देत नाही. शिवाय प्रदूषण महामंडळदेखील दुर्लक्ष करीत आहे.

### नदीसुधार प्रकल्प कागदावरच

नदीसुधार प्रकल्पाचे काम कागदावरच असल्याने नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. परिसरातील काही कंपन्या दूषित पाण्यावर प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात पाणी सोडतात अशा कंपन्यांवर कारवाई का केली जात नाही, असा प्रश्न इंद्रायणी नदीलगतच्या ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

**गटारांसह नाल्याचे पाणी थेट नदीत**

श्रीक्षेत्र देहूपासून ते आळंदीदेवाचीपर्यंत इंद्रायणी नदीलगतच्या गावांमधून तसेच पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणारी गटारे, नाल्यांतील दूषित व रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडण्यात आले आहे. नदीवरील पुलावरून ठिकठिकाणी कचरा, राडारोडा, टाकण्याचे काम राजरोसपणे चालू आहे. या प्रकारामुळे इंद्रायणी गटारगंगा झाली असून, आता इंद्रायणी नदीमध्ये जलपर्णी वाढू लागली आहे. नदीत दिवसाआड केमिकलयुक्त फेस येत आहे.

# आजी-माजी आमदारांचे बदनामीकारक व्हिडिओ फेसबुकवर प्रसारित

### दोघांवर गुन्हा दाखल

वृत्तसंस्था

**पोखरापूर/सोलापूर :** मोहोळचे माजी आमदार राजन पाटील त्यांच्या मुलांचे तसेच विद्यमान आमदार यशवंत माने यांचे चेहरे एडिट व्हिडीयो फेसबुकवर प्रसारित केल्याची घटना घडली.



या व्हिडियोमध्ये आक्षेपार्ह अश्लील हावभाव, शब्दोच्चार, भाषा असलेले बदनामीकारक व्हिडिओ एका तरुणाकडून तयार करण्यात आले होते. या प्रकरणी संदीप रोकडे नावाच्या फेसबुक अकाउंट वापरकर्त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी प्रवक्ते उमेश पाटील आणि माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांचेही चेहरे एडिट करून अश्लील हावभाव करतानाचे व्हिडिओ तयार करण्यात आले होते. या व्हिडियोवर आक्षेपार्ह कमेंट केल्याबद्दल पहलाज सेवालानी नावाच्या फेसबुक अकाउंट वापरकर्त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी (दि.६) घडली.

# दुचाकीवरून जाणाऱ्या 2 तरुणांकडे सापडली 1 लाख 42 हजारांची रोकड

### सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

वृत्तसंस्था

**पोखरापूर / सोलापूर :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूरचे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मोहोळ शहरात पेट्रोलिंग करत होते. यावेळी विना नंबर प्लेटच्या स्कुटीचा संशय आल्याने पोलिसांनी गाडी थांबवून दोन युवकांकडे चौकशी करून गाडीची झडती घेतली. यावेळी त्याच्यामध्ये १ लाख ४२ हजार रुपये रोकड मिळून आली. पोलिसांनी या प्रकरणी दोघांवर कारवाई करत रक्कम जप्त केली. ही घटना ६ नोव्हेंबर रोजी मोहोळ सोलापूर महामार्गावर हॉटेल अंजनी समोर घडली. याबाबत मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूरचे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मोहोळ शहरात पेट्रोलिंग करत होते. मोहोळ ते सोलापूर जाणाऱ्या रोडवर हॉटेल अंजनी समोरून एक पांढऱ्या रंगाची विना नंबरप्लेट असलेली स्कुटर जाताना दिसली. तिचा पोलिसांना संशय आल्याने पोलिसांनी गाडी थांबवून त्यावर असलेल्या विशाल दादाराव कापुरे रा. कोळेगाव ता. मोहोळ व संदेश सुधीर काळे रा. काळे वस्ती, मोहोळ या दोन्ही तरूणांकडे चौकशी करून झडती घेतली.



# १३ ते १५ वर्षे वयोगटातील १४ टक्के विद्यार्थी तंबाखूच्या आहारी

### विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतली गंभीर दखल

विशेष प्रतिनिधी

**वर्धा :** शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांत तंबाखूजन्यतेचे व्यसन वाढते असून १३ ते १५ वर्षे वयोगटातील सुमारे १४ टक्के विद्यार्थी तंबाखूच्या आहारी गेल्याचा अहवाल जाहीर झाला आहे. हा अहवाल ग्लोबल यूथ टोब्याकोच्या सर्वेक्षणावर आधारित आहे. ग्लोबल यूथ टोब्याकोच्या सर्वेक्षणातून अहवालाद्वारे ही माहिती देण्यात आली आहे. या अहवालाची गंभीर दखल विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतली असून कुलगुरू, कनिष्ठ महाविद्यालय, महाविद्यालयांना पत्र लिहून महाविद्यालय आवारात, परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होणार नाही, याकरिता कठोर पावले उचला, असे निर्देशित केले आहे. यातच आणखी पुढचे पाऊल पडत काही विद्यार्थ्यांत ई सिगारेटचे व्यसनही वाढायला लागले आहे. ही नव्या उभरत्या पिढीबाबत समाजात चिंता वाढविणारी बाब आहे. अन्न व भेसळ प्रशासन अशा विक्रेत्यांवर छापे घालत असले तरी या तंबाखूजन्य पदार्थांची लपूनछपून विक्री होतच आहे. त्यालाच ई सिगारेटच्या वाढत्या व्यसनाची जोड मिळाल्याने चिंतेतली भर वाढती आहे. विद्यापीठ अनुदान आयोग तसेच आरोग्य मंत्रालयाने तंबाखूजन्य पदार्थमुक्त कॅम्पसकरिता तयार केलेली मार्गदर्शक तत्त्वेही कनिष्ठ महाविद्यालय तसेच महाविद्यालयाना पाठविली आहे. त्यानुसार शाळा, महाविद्यालयाच्या १०० यार्ड अंतरापर्यंत तंबाखूजन्य पदार्थ विकता येणार नाही. आरोग्य अभ्यासकांच्या म्हणन्यानुसार तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेवर विपरित परिणाम होतो, पण काही साठेबाज याची चोरून विक्री करतातच. एक युवा पिढी बरबादीच्या वाटचालीत गुटखा, खर्रा, ई-सिगारेटचा वाढता वाटा समाज चिंता वाढविणारा आहे.



# महाराष्ट्र सरकार आरोग्य क्षेत्रात 'अनुत्तीर्ण'

### जन आरोग्य अभियानच्या सर्वेक्षणात १०० पैकी २३ गुण

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** महाराष्ट्राच्या आरोग्य क्षेत्रामध्ये अनेक त्रुटी असून, सर्वसमावेशक आरोग्य धोरणांचा अभाव दिसून येत आहे. खासगीकरणावर अवलंबून राहिल्यामुळे राज्यातील आरोग्य सेवा कमकुवत झाली असून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील कामगिरी असमाधानकारक आहे, असा दावा करत नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यामध्ये सरकार अनुत्तीर्ण झाले असल्याचा ठपका 'जन आरोग्य अभियान'च्या अहवालात ठेवण्यात आला आहे. मंगळवारी जाहीर झालेल्या अहवालात आरोग्य क्षेत्रात कोणत्या सुधारणा कराव्यात यासाठी 'जनतेचा आरोग्य जाहीरनामा २०२४' सुद्धा 'जन आरोग्य अभियान'ने जाहीर केला आहे. सरकारच्या आरोग्य क्षेत्रातील कामगिरीबाबत १० आरोग्य सेवा व निकषांच्या आधारे 'जन आरोग्य अभियान'ने अहवाल तयार केला आहे. यामध्ये अपुऱ्या पायाभूत सुविधा, नधी, कर्मचाऱ्यांचा तुटवडा, औषध पुरवठा, रुग्णालयांचे खासगीकरण, विमा योजना, रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण आणि भ्रष्टाचार आदी मुद्यांवर लक्ष केंद्रीत केले आहे.



**औषध खरेदीवर फक्त सहा टक्के खर्च**

राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये वारंवार औषधांचा तुटवडा जाणवत असतानाही औषध खरेदीसाठी एप्रिल ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान, अर्थसंकल्पाच्या फक्त सहा टक्के खर्च करण्यात आला. २०२३-२४ मध्ये औषध खरेदीसाठी आठ कोटी रुपयांची तरतूद केली गेली. २०२४-२५ मध्ये हीच तरतूद आणखी कमी करून ६.२७ टक्के इतकी केली गेली.

# मला आधीच क्लिन चीट मिळाली, पुन्हा तुरुंगात जाण्याची भीती नाही!

### छगन भुजबळांकडून आरोपांचा इन्कार

वृत्तसंस्था

**मुंबई :** ईडीच्या कारवाईपासून सुटका मिळण्यासाठी अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष भाजपबरोबर महायुती सरकारमध्ये सहभागी झाला आणि ईडीपासून सुटका म्हणजे एक प्रकारे पुनर्जन्मच होता असे छगन भुजबळ म्हणाले, असा दावा एका पुस्तकात करण्यात आला आहे.

या आरोपांवर आज भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले. 'मी अशी कुठलीही मुलाखत दिलेली नाही. ईडीपासून सुटकेसाठी आम्ही भाजपासोबत गेलो किंवा महायुतीत आलो असा आरोप आमच्यावर आधीपासून होतोय. कोर्टाने मला उद्धव ठाकरे यांचे सरकार होते तेव्हाच 'महाराष्ट्र सदन' प्रकरणात क्लिन चीट दिली. कोर्टाचा निकाल आल्यावर मी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना पेढेही दिले आहेत. त्यामुळे मला तुरुंगात जाण्याची भीती आहे या सगळया गोष्टींचा मी इन्कार करतो', अशा शब्दांत छगन भुजबळ यांनी ईडी आणि महायुतीसंदर्भात वक्तव्य केल्याचे सर्व आरोप फेटाळून लावले.

# गहाळ झालेले तब्बल ३१ मोबाईल्स केले हस्तगत

**सोलापूर :** जोडभावी पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नागरिकांचे वेगवेगळया ठिकाणावरून गहाळ झालेले तब्बल ३१ अँड्रॉईड मोबाईल्स तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन हस्तगत करण्यात जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील डी. बी. पथकाच्या पोलिसांना यश आले आहे. यामध्ये सुमारे पावणे पाच लाख रुपये किमतीचे मोबाईल मिळून आले आहेत.

दरम्यान, दिवसेंदिवस मोबाईल चोरीला गेल्याच्या तक्रारी वाढत होत्या. यापार्श्वभूमीवर तब्बल ३१ मोबाईलचा शोध जोडभावी पेठ पोलीस ठाणेकडील डी. बी. पथकाने लावला आहे.



**दौंड/पुणे :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजारात कांद्याची आवक कमी झाल्याने बाजारभाव वाढले आहेत. दरम्यान, जुना कांदा प्रतिकिलो ६६ रुपये, तर नवीन कांद्याला प्रतिकिलो ४५ रुपये दर मिळाला.

# सांगलीत अडीच लाखांचा गांजा जप्त

वृत्तसंस्था

**सांगली :** संजयनगरमधील गांधी कॉलनी येथे मोपेडवरून गांजा घेऊन चाललेल्या दोघांना स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने अटक केली. त्यांच्याकडून अडीच लाखांचा गांजा, एक लाखाची मोपेड असा ३ लाख ५० हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

इनाममुलहसन बाबासाहेब शेख (२८) व अरमान मिरासाब शेख (२०) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. या दोघांना गांजा पुरवणारा अरबाज ऊर्फ इप्तेखार बाबासाहेब शेख हा पसार झाला. पोलिसांच्या पथकाला दि. ५ रोजी जुना कुपवाड रस्त्यावरील दुधाळ कॉर्नरजवळून मोपेडवरून गांजा विक्रीसाठी काहीजण येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पथकाने गांधी कॉलनी परिसरात सापळा रचला. पथकाला मोपेडवरून दोघेजण येताना दिसले. पथकाने संशयावरून त्यांना थांबवले. त्यांच्या मोपेडवर असलेल्या पिशवीची तपासणी केली असता गांजा मिळून आला. गांजा कोठून आणला याची चौकशी केली असता, इनाममुलहसन याने त्याचा भाऊ अरबाज याच्याकडून गांजा आणला असून, तो विक्रीसाठी घेऊन चालल्याचे सांगितले.

### बनावट नोटा प्रकरणातील फरार विश्वनाथ जोशी याला अटक

**नृसिंहवाडी:** कोल्हापूर नजीकच्या गांधीनगर येथे बनावट नोटा चलनात आणल्याप्रकरणी मुख्य आरोपी विश्वनाथ सुहास जोशी (४४) याला नृसिंहवाडी येथून अटक केली. ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पथकाने केली. २०१९ पासून तो फरारी होता. गांधीनगर पोलीस त्याच्या शोधात होते. जोशी मूळचा तासगाव तालुक्यातील डोंगरसोनी गावचा रहिवासी आहे. २०१९ पासून त्याने नृसिंहवाडीमध्ये आपले बस्तान बसवले होते.

# विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

### सोडून देणार असल्याचे वारंवार सांगितल्याने नैराश्य

**पुणे :** लग्न झाले असतानाही दुसऱ्या महिलेशी प्रेमसंबंध ठेवून पत्नीला तुला सोडून देणार असल्याचे वारंवार सांगितल्याने या मानसिक छळाला कंटाळून विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. सुवर्णा मनीष पुरी (३८) असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. या प्रकरणी तिच्या भावाने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी तिचा पती मनिष नारायण पुरी (४३) आणि नंणद (५०) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार २८ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा ते अडीच वाजेच्या दरम्यान घडला. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची बहिण सुवर्णा ही सासरी नांदत असताना तिचा पती मनिष हा दारु पिऊन तिला शिवीगाळ व मारहाण करत असे.

# बाबा सिद्दिकी हत्येप्रकरणी पुण्यातून आणखी दोन जणांना अटक

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी आणखी एक मोठी अपडेट समोर आली आहे. मुंबई गुन्हे शाखेने पुण्यातून आणखी दोन आरोपींना अटक केली आहे. बुधवारी रात्री पुण्यातून पकडलेल्या या आरोपींना मुंबईत आणण्यात आले असून, तपासात त्यांचा या प्रकरणाशी संबंध असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या अटकेनंतर आतापर्यंत या प्रकरणात एकूण १८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.


पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी लॉरेन्स बिश्नोई टोळीचा थेट संबंध असल्याचे समोर आले आहे. गुन्हे शाखेने शनिवारी महानगर दंडाधिकारी न्यायालयात ही माहिती दिली. त्यानुसार तुरुंगात असलेल्या लॉरेन्स बिश्नोई याचा भाऊ अनमोल बिश्नोई याने सिद्दिकी यांचे वांद्रे पश्चिमेतील घर, कार्यालय आणि मुलगा झीशान सिद्दिकी यांच्या कार्यालयाची रेकी करण्याचे काम सोपवले होते.

**पाच जणांना वॉंटेड घोषित केले**

सुजित सिंहच्या पोलीस कोठडीची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली. तो अनमोल बिश्नोईच्या संपर्कात असल्याचे पोलिसांनी सांगितले. हत्येसाठी वापरलेली शस्त्रे मिळवून ती नितीन सप्रे आणि राम फूलचंद कनोजिया याच्यापर्यंत पोहोचवण्यातही त्याचा सहभाग होता. यानंतर त्याने ते शुटरांच्या ताब्यात दिले. सप्रे आणि कनोजिया या दोघांनी सिद्दिकी आणि त्यांच्या मुलाच्या घराची आणि कार्यालयांची तपासणी केली होती. शनिवारी पोलिसांनी अनमोल बिश्नोई, शुभम लोणकर, झीशान अख्तर आणि शूटर शिवकुमार गौतम याला या प्रकरणी वॉंटेड घोषित केले.

तपासादरम्यान आरोपींना त्यांच्या टार्गेटची संपूर्ण माहिती असल्याचे समोर आले. हत्या करण्यासाठी त्यांच्याकडे शस्त्रे लपवून ठेवली होती, त्यांच्याकडून सुमारे ४० गोळया जप्त करण्यात आल्या आहेत. फरार आरोपी शुभम लोणकर याने या दोघांना हत्येत वापरण्यासाठी शस्त्रे पुरवली होती आणि ती लपवून ठेवण्यास सांगितले होते. या प्रकरणी पोलिसांनी आता आरोपींची चौकशी सुरू केली आहे.

**आरोपींनी आधीच लपवली होती शस्त्रे**



# दिंडीत दुचाकी घुसून महिला ठार, पाच जखमी

वृत्तसंस्था

**कवठेमहांकाळ/सांगली :** मिरज-पंढरपूर महामार्गावर बोरगाव (ता. कवठे महांकाळ) येथे टोलनाक्याजवळ पंढरपूरला विठ्ठल दर्शनासाठी निघालेल्या पायी दिंडीत भरधाव दुचाकी घुसल्याने दिंडीतील एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. पाचजण गंभीर जखमी झाले. हा अपघात गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास झाला.

सुमन धोंडिबा पाटील (४०) रा. मोरेवाडी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर असे मृत महिलेचे नाव आहे. अतुल रघुनाथ पाटील (२७) रा. अर्जुनवाड, ता. शिरोळ, श्रीपती गोविंद देसाई (७०) रा. हिंगणगाव, ता. कवठे महांकाळ, अनिता ज्ञानू दुधाळ (३२) रा. अंकले, ता. जत, प्रदीप विष्णू मगदूम (४२) रा. अर्जुनवाड, ता. शिरोळ अशी जखमींची नावे आहेत. धडक देणारी दुचाकीस्वार महिलाही गंभीर जखमी झाली. तिचे नाव समजू शकले नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड परिसरातील भाविक कार्तिक वारीसाठी पंढरपूरकडे निघाले होते. भाविक महामार्गावरून चालत होते. कवठे महांकाळ तालुक्यातील बोरगाव गावच्या हद्दीत दिंडी आल्यानंतर मागून येणारी भरधाव दुचाकी (क्र. एमएच ०९, जीडी ४३९१) दिंडीत घुसली. वारकऱ्यांच्या अंगावर गाडी गेल्याने एक महिला ठार तर पाच वारकरी जखमी झाले.

# तोतया डॉक्टरकडून वयोवृद्ध महिलेची लाखोंची फसवणूक

### शस्त्रक्रियेच्या नावाखाली लुबाडले

वृत्तसंस्था

**मुंबई :** एका तोतया डॉक्टरने गुडघ्यांवर शस्त्रक्रिया करून दिल्याचा बनाव रचत वृद्ध महिलेकडून लाखो रुपये उकळल्याची घटना अंधेरीत उघडकीस आली आहे. या तोतया डॉक्टरसह त्याच्या साथीदाराविरोधात या प्रकरणी ओशिवरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी महिलेकडून सव्वा सात लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे.

ओळखपाळख नसलेल्या व्यक्तीकडून मिळालेल्या संपर्क क्रमांकावरून डॉक्टरशी संवाद साधत उपचार करून घेण्याचा प्रकार अंधेरीतील ६१ वर्षीय महिलेच्या अंगलट आला. डॉ. झफर मर्चंट हा तोतया डॉक्टर आणि त्याचा सहकारी विनोद गोयल यांनी मिळून २०२१च्या नोव्हेंबरमध्ये या महिलेची आणि तिच्या कुटुंबाची फसवणूक केली होती. मात्र, तीन वर्षांनंतर मंगळवारी या प्रकरणी तक्रारदार महिलेने पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

# हरित लवादामुळे राज्यातील गृहप्रकल्प पुन्हा रखडणार!

वृत्तसंस्था


**मुंबई :** पर्यावरणविषयक परवानग्या राज्यातील समितीऐवजी केंद्रीय पर्यावरण विभागातील समितीकडून घेण्याचे आदेश राष्ट्रीय हरित लवादाने दिल्यामुळे आता राज्यातील गृहप्रकल्प रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याविरोधात विकासकांच्या संघटनांनी सर्वोच्च न्यायालय तसेच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे दाद मागितली आहे.

राज्यातील गृहप्रकल्पांना पर्यावरणविषयक परवानग्यांसाठी राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मूल्यांकन समितीकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागत होते. मात्र, ते पुरेसे नसून केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अखत्यारित येणाऱ्या विभागीय तज्ज्ञ मूल्यांकन समितीकडूनही ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असल्याचा निकाल राष्ट्रीय हरित लवादाने ऑगस्ट महिन्यात दिला. आता या निकालाचे परिणाम दिसत आहेत. राज्यस्तरीय समितीकडून या निकालाचा हवाला देत मंजुऱ्या नाकारल्या जात आहेत. त्यामुळे आता अनेक गृहप्रकल्प रखडणार असल्याची भीती विकासकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या कन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (क्रेडाई) व्यक्त केली आहे.

# शिवडी, वरळी बीकेसीत अशुद्ध हवा

### मुंबईची हवा गुणवत्ता खालावली

**मुंबई :** मुंबईतील हवेचा निर्देशांक बुधवारी सकाळी मध्यम श्रेणीत नोंदला असून शिवडी, वरळी तसेच वांद्रे-कुर्ला संकुल येथे 'वाईट' हवेची नोंद झाली. मुंबईतील हवेची गुणवत्ता मंगळवारीही मध्यम श्रेणीत होती. 'समीर' ॲपनुसार बुधवारी सकाळी मुंबईच्या हवेचा निर्देशांक ११४ वर पोहोचला होता. मुंबईत सध्या आर्द्रता असल्याने सकाळी प्रदूषके साचून राहतात. समीर ॲपच्या नोंदीनुसार, बुधवारी सकाळी शिवडी येथील हवा निर्देशांक २२६, तर वरळी येथील २२५ इतका होता. तसेच खेरवाडी-वांद्रे २०५, वांद्रे -कुर्ला संकुल हवा निर्देशांक २२५ इतका होता.



दरम्यान, मंगळवारीदेखील सायंकाळी हवा मध्यम श्रेणीत नोंदली गेली होती. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार, हवा गुणवत्ता निर्देशांकातील ०-५० म्हणजे चांगले, ५१-१०० समाधानकारक, १०१-२०० मध्यम, २०१-३०० वाईट, ३०१-४०० अत्यंत वाईट आणि ४०० पेक्षा जास्त म्हणजे अतिधोकादायक समजली जाते.

पुण्यभूमी


**सुविचार-** मनोबल व नैतिक धैर्य ही संकटातून बाहेर काढणारी दुधारी शस्त्रे आहेत.

# महाराष्ट्र बुडाला तर....!

देशाच्या विकासात, प्रगतीत महाराष्ट्राचा फार मोठा हातभार आहे, हे सत्य नाकारण्यात अर्थ नाही. महाराष्ट्राला देशाच्या अर्थव्यवस्थेचे इंजिन म्हटले जाते. राज्याच्या निर्मितीपासून पुढचे काही दशके महाराष्ट्र आर्थिक प्रगतीच्या बाबतीत देशात कायम अव्वल राहत आला; परंतु महाराष्ट्रातील राजकारणाने गेल्या दशकभरात आपली कूस बदलली आणि महाराष्ट्राची आर्थिक अधोगती सुरू झाली. अर्थात आजही हे राज्य देशातील अव्वल पाच राज्यांमधील आपले स्थान टिकवून आहे; परंतु गेल्या दशकभरात ज्या गतीने राज्याची आर्थिक घसरण होत आहे ती तशीच कायम राहिली तर महाराष्ट्राचा 'बिमारू' राज्यांच्या गटात समावेश होण्याची दाट शक्यता आहे. या संदर्भात गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये चर्चा सुरू आहे. शरद पवार सारख्या नेत्यानेही महाराष्ट्राच्या या घसरणीबद्दल चिंता व्यक्त केली आहे आणि नेहमीप्रमाणे विद्यमान सत्ताधाऱ्यांनी याचे खापर महाविकास आघाडीच्या पहिल्या अडीच वर्षांच्या कारभारावर फोडले आहे. ही चर्चा सुरू होण्यास कारणीभूत ठरला तो पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेशी संबंधित तज्ज्ञांचा एक अहवाल. त्या अहवालात महाराष्ट्राच्या आर्थिक घसरणीचा उहापोह करण्यात आला आहे. हा अहवाल तयार करणारे थेट पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेशी संबंधित असल्यामुळे या अहवालाच्या खरेपणावर विद्यमान सत्ताधाऱ्यांना आक्षेप घेता येणार नाही. अर्थात हा अहवाल केवळ वर्तमान सरकारच्या कारभाराशी संबंधित नाही तर गेल्या दशकभरातील महाराष्ट्राची आर्थिक स्तरावरील कामगिरी हा या अहवालाचा विषय आहे. या अहवालात महाराष्ट्र मागासलेला आहे, असे अजिबात म्हटलेले नाही, महाराष्ट्र अजूनही आर्थिकदृष्ट्या भक्कमच आहे, राज्याची प्रगतीदेखील संथगतीने का होईना सुरू आहे; परंतु गेल्या दशकभरात इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राच्या प्रगतीची गती कशी सातत्याने मंदावत गेली याचा लेखाजोखा या अहवालात मांडण्यात आला आहे. एखाद्या राज्याच्या आर्थिकस्थितीचे मूल्यमापन करायचे झाल्यास ते प्रामुख्याने दोन घटकांवर केले जाते, एक म्हणजे त्या राज्याचे दरडोई उत्पन्न आणि दुसरे म्हणजे देशाच्या उत्पन्नात त्या राज्याचा असलेला वाटा. या दोन्ही बाबतीत एकीकडे महाराष्ट्राची सातत्याने घसरण होत असताना दुसरीकडे शेजारचे गुजरात आणि दक्षिणेकडील काही राज्ये तितक्याच सातत्याने प्रगती करीत असल्याचे, या अहवालात म्हटले आहे. २०१०-११च्या अहवालानुसार जीएसडीपीच्या बाबतीत महाराष्ट्र प्रथम स्थानी होता; परंतु २०१२-१३ पासून मात्र स्थिती बदलू लागली. या वर्षात जीएसडीपीच्या बाबतीत हरियाणाने महाराष्ट्राला दुसऱ्या क्रमांकावर ढकलले. २०१८-१९ मध्ये तर महाराष्ट्र हरियाणा, कर्नाटक, तेलंगणा आणि तमिळनाडूच्याही मागे पडले. महाराष्ट्राच्या या घसरणीला कोण जबाबदार आहेत, या प्रश्नाचे निश्चित असे उत्तर देता येत नसले तरी या कालखंडात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना असे सगळेच पक्ष आलटून पालटून सत्तेत होते, त्यामुळे ही या सगळ्याच राज्यकर्त्या पक्षांची सामूहिक जबाबदारी म्हणावी लागेल. कोणाच्या कार्यकाळात महाराष्ट्र किती मागे पडला, या चर्चेला अर्थ नाही. महाराष्ट्र मागे पडत गेला आणि हे मागे सरणे अजून संपलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. गेल्या दशकभराचा विचार केला तर महाराष्ट्राचे नेते राजकीय साठमाऱ्यांमध्येच अधिक अडकून पडल्याचे दिसते. वैयक्तिक हेवेदावे, त्यातून निर्माण झालेले सूडाचे राजकारण, त्यासाठी वाटेल त्या थरास जाण्याची वृत्ती आणि याच्या जोडीला सरकारी यंत्रणांचा गैरवापर करीत विरोधकांना वठणीवर आणण्याची बळावत चाललेली प्रवृत्ती, या सगळ्याचा परिणाम राज्याच्या आर्थिक प्रगतीवर निश्चितच झाला. एकेकाळी हे राज्य प्रशासकीय शिस्त आणि पुरोगामी राजकारण यासाठी ओळखले जात होते. या दोन्हींचा आता पार बोऱ्या वाजला आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांसाठी महाराष्ट्र आदर्श राज्य उरले नाही. त्याचा फायदा शेजारच्या राज्यांनी उचलला. राजकीय साठमारीमुळे महाराष्ट्रातील गुंतवणूक जोखमीची ठरू लागली, त्यामुळे अनेक बडे प्रकल्प महाराष्ट्राला वळसा घालून शेजारच्या गुजरातमध्ये किंवा दक्षिणेकडील राज्यात गेले. राज्यातील औद्योगिक गुंतवणुकीला ब्रेक लागल्यामुळेच महाराष्ट्राची आर्थिक प्रगती मंदावली आणि ती पूर्ववत होण्यासाठी आजच्या किंवा कालच्या सत्ताधाऱ्यांकडून पुरेशा गांभीर्याने प्रयत्न झाले नाही. या लोकांचा वेळ आणि ताकद एकमेकांची जिरविण्यातच खर्ची होत आहे. महाराष्ट्र बुडाला तर देश बुडाला, असे म्हटले जायचे. आपल्या डोळ्यासमोर हा महाराष्ट्र बुडत असतानाही कोणत्याही जबाबदार नेत्याला त्याचे काही वैषम्य वाटत नसल्याचे दिसते.

# पुन्हा तीच जोखीम.....!

मागच्या विधानसभा निवडणुकीत भाजप आणि तत्कालीन एकसंध शिवसेना यांची युती होती. दोन्ही पक्षांनी संयुक्त प्रचार केला. प्रचारसभांदरम्यान पंतप्रधान मोदी आणि अमित शाह सारख्या लोकांनी राज्यात युतीची सत्ता आली तर देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होतील याची ग्वाही अप्रत्यक्षरित्या अनेकदा दिली. त्यापैकी काही सभांमध्ये मंचावर उद्धव ठाकरेदेखील उपस्थित होते. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रिपदाबद्दल चकार शब्दही काढला नव्हता. निवडणूक संपली आणि शिवसेनेच्या पाठिंब्याशिवाय भाजपचे सरकार स्थापन होऊ शकत नाही हे लक्षात येताच उद्धव ठाकरेंना अमित शहांनी बंद दाराआड दिलेले वचन आठवले. त्याच वेळी काँग्रेस-राष्ट्रवादीकडून शिवसेनेला मुख्यमंत्रिपदाचे गाजर दाखविले जात होते, त्यामुळे अमित शाहांच्या त्या वचनाचा वारंवार दाखला उद्धव ठाकरे देऊ लागले. ही जी काही वचनाची देवाणघेवाण झाली त्यावेळी बंद दाराआड अमित शाह आणि उद्धव ठाकरे दोघेच होते. त्यामुळे त्या वचनाच्या बाबतीत खरेखोटे ते दोघांनाच माहित; परंतु त्या दिल्याघेतल्या वचनामुळे पुढचे राजकीय महाभारत घडले. आताही तसे होईल का, हा प्रश्न उपस्थित होऊ पाहत आहे. अमित शाहांनी शिराळ्याच्या सभेत महायुतीला बहुमत मिळाले तर देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील, असे अप्रत्यक्षपणे स्पष्ट केले आहे. शिराळा सांगलीतील तालुका आहे, तिथे काही देवेंद्र फडणवीस निवडणुकीला उभे नाहीत; परंतु शिराळ्याच्या सभेत उपस्थित मतदारांना तुम्हाला देवेंद्र फडणवीसांना विजयी करायचे आहे, असे आवाहन अमित शहांनी केले. याचा अर्थ स्पष्ट आहे; परंतु या दरम्यान मागच्या काही दिवसात एकनाथ शिंदे, अजित पवारांसोबत अमित शाहांनी अनेकदा बंदद्वार चर्चा केली आहे. त्या चर्चेदरम्यान त्यांनी पुन्हा एकदा तसलेच आश्वासन किंवा वचन दोघांनाही किंवा दोघांपैकी एकाला दिले असेल तर निवडणुकीनंतर पुन्हा तेच नाटक दुसऱ्यांदा उभे राहू शकते. ही अशी जोखीम घेण्याऐवजी सरळसरळ महायुती सत्तेत आली तर देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री होतील, असे त्यांनी जाहीरपणे घोषित करावे. म्हणजे संभ्रमही दूर होईल, जोखिमही राहणार नाही आणि बाकीच्या उत्सुकांनाही ऐनवेळी धावपळ करावी लागणार नाही, ते आतापासूनच योग्य त्या तयारीला लागतील.

## भाष्य

# अजितदादांचे बोल आणि त्यातील कवित्व


पंकज वैद्य

9823014040


पाच वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत जाऊन अजित पवारांनी पहाटे पहाटे केलेला शपथविधी असो, अथवा अडीच वर्षांपूर्वी नाट्यमयरित्या शरद पवारांची साथ सोडून परत एकदा फडणवीस यांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचा दादांनी घेतलेला निर्णय असो, अजित दादा पवार यांच्या या नाट्यमय प्रवासाची स्क्रिप्ट दहा वर्षांपूर्वी, तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी लिहून ठेवली होती का? असा प्रश्न आज निर्माण होत आहे.

अर्थात आबा पाटील यांनी तशी स्क्रिप्ट लिहिली असेल, तर त्या स्क्रिप्टनुसार अजित पवार यांचा प्रवास कोणत्याही परिस्थितीत सत्तास्थानाकडे होणार नव्हता, कारण सत्तर हजार करोड रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणीच्या चौकशीच्या फाईलवर, ज्यावेळी आर. आर. पाटील यांनी सही केली, त्यावेळेस असलेले मुख्यमंत्री, पृथ्वीराज चव्हाण यांच्यापर्यंत ही फाईल का पोहोचली नाही, याचे कारण अजूनपर्यंत गुलदस्त्यात आहे.

ही फाईल ज्यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या हातामध्ये आली त्यावेळी आर. आर. पाटलांनी अजित पवारांकरिता लिहिलेल्या भूमिकेत आपण बदल करू शकतो, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांना वाटला असावा. ही फाईल हाताशी आल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्याकडे गळाला लागलेल्या मासा याशिवाय दुसऱ्या नजरेने बघितलेच नसावे.

सिंचनावर भरपूर खर्च केला जात आहे; परंतु सिंचनाच्या क्षेत्रात अजिबात वाढ होत नसल्याचे नागपूरच्या जनमंचने केलेल्या सर्वे प्रसिद्ध झाल्यावर कुरबुरी वाढल्या आणि अजित पवार यांच्याविरुद्ध तक्रार झाली. अशा प्रकारची तक्रार करण्यात विदर्भातील फडणवीस, गडकरी यांचासुद्धा हात असल्याचे सांगितले जाते. आर. आर. पाटील यांच्यापर्यंत ही तक्रार पोहचली. त्यावेळी होऊन जाऊ दे एकदाची चौकशी असे म्हणत, पाटील यांनी या चौकशीच्या फाईलवर सही केल्याचे सांगण्यात येते. अजित पवार आपल्याच पक्षाचे नेते आहेत, ते शरद पवार यांचे पुतणे आहेत, असा काही विधीनिषेध न बाळगता आर. आर. पाटील यांनी केलेली ही कृती निश्चितच कौतुकास्पद आहे. आर. आर. पाटील यांच्या याच कौतुकास्पद कृतीचे वर्णन दोन दिवसांपूर्वी अजित पवार यांनी 'केसाने गळा कापला', अशा शब्दात केलेले आहे. मग केसांनी आपला गळा कापला जाईल, एवढा आपला गळा नाजूक नाही हे अजित पवार यांनी स्वतःच्या कृतीमधून दाखवून द्यायला हवे होते!

ज्या घोटाळ्यात अजित दादा 'तुरुंगात चक्की पिसिंग अँड पिसिंग', असा दावा देवेंद्र फडणवीस करत होते, अजित पवारांवरील ज्या आरोपांचा उल्लेख पंतप्रधानांनी मध्य प्रदेशातील एका जाहीर सभेमध्ये करून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सर्वात भ्रष्टाचारी पक्ष संबोधले होते, त्याच नेत्यांच्या पुढाकाराने अजित पवार यांनी स्वतःला या आरोपामधून मुक्त करून घेण्याकरिता भाजपमधेच प्रवेश घेतला आणि स्वच्छ झाले.

आज आर. आर. पाटील यांचा मुलगा निवडणुकीत उभा असलेल्या मतदारसंघात जाऊन अजित पवार यांनी याबाबतचा खुलासा केला आहे. आर. आर. पाटील यांनी सही केलेली ती फाईल, जर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरोखरच अजित पवार यांना दाखवली असेल, तर देवेंद्र फडणवीस यांनी गोपनीयतेच्या तत्त्वाचा भंग केला असल्याचे जाणकार सांगत आहेत, कारण आर. आर. पाटील यांनी सही केलेल्या त्या फाईलनुसार अजित पवार हे आरोपी होते. मग आरोपीलाच फाईल दाखवण्यामागे देवेंद्र फडणवीस यांचे काय प्रयोजन असावे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

'मी बोललो तर' या शीर्षकाखाली मी मागे एक लेख लिहिला होता. राजकारणातील प्रत्येक नेता कधी ना कधी 'मला तोंड उघडायला भाग पाडू नका', 'मी बोललो तर महागात पडेल', अशा प्रकारच्या धमक्या देताना आजकाल दिसून येतो. अशा प्रकारच्या गर्भित धमक्यांमधून आपण दोघांनीही एकमेकांच्या पापावर पांघरूण घालणेच योग्य राहील, असे त्यांना सुचवायचे असते. नारायण राणे, जर आपण मातोश्रीवर खोके पोचवल्याचे सांगत असतील, तर खोके वसुलीच्या पापात त्यांचा सहभाग असल्याची कबुली त्यांच्याकडून आलेली आहे, असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे मातोश्रीवर खोके पोहचवले होते याबाबतीत मौन बाळगणे हेच नारायण राणे यांच्याकरिता सोयीस्कर ठरते; परंतु कधीकधी अनवधानाने अशा प्रकारचे सत्य नेत्यांच्या तोंडून निघून जाते.

आता आर. आर. पाटील यांच्याच मतदारसंघात जाऊन, अजित दादांनी त्यांच्यावर केसाने गळा कापल्याचा आरोप केलेला आहे. मात्र, दादांच्या या आरोपामुळे पूर्वीपासूनच उजळ असलेली आबा पाटलांची प्रतिमा आणखीन उजळ झालेली आहे आणि सत्तर हजार करोड रुपयांच्या घोटाळयातून मुक्त होण्याकरिता, अजित पवारांनी चालवलेली सर्कस पुन्हा एकदा ठळकपणे जनतेच्या नजरेत आलेली आहे.

आर. आर. पाटील यांनी सही केलेल्या, त्या चौकशीच्या फाईलचा उपयोग देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांना ब्लॅकमेल करण्याकरिता केला आहे का? असा प्रश्न आता निर्माण होत आहे. ही फाईल अजित पवारांना दाखवत तुमच्या पुढे आता आमच्या चरणी लोटांगण घालण्यापासून पर्याय नसल्याचे फडणवीस यांनी त्यांना सांगितले होते, की त्यातील काही मलिदा आम्हालाही द्या, अशी सौदेबाजी केली? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फडणवीस यांनी ज्याच्यावर छातीठोकपणे आरोप केले होते, तोच आरोपी त्यांच्यासोबत सत्तेच्या पंक्तीत जाऊन बसल्यानंतर हे प्रकरण साधे नसल्याचे महाराष्ट्रातील जनतेच्या लक्षात आले आहे. त्यानंतर सत्तर हजार करोड रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणातून त्यांना क्लीन चीट कशी मिळाली? यामागील किळसवाण्या राजकारणाची शिसारी महाराष्ट्रातील जनतेला आली होती. म्हणूनच महाराष्ट्रातील जनतेने लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला जबरदस्त झटका दिला होता. अजित पवार तर स्वतःच्या पत्नीची सीटदेखील वाचवू शकले नव्हते. त्यामुळे आज विधानसभा निवडणुकीच्या प्रचारातसुद्धा अजित पवारांची दमछाक होत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास दादांनी पूर्वीच गमावला होता; परंतु आता तर त्यांचा मित्र पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाचासुद्धा त्यांच्यावर विश्वास राहिलेला नाही. भारतीय जनता पक्षाचा अजित दादांवर विश्वास राहिला नाही, असे म्हणण्यापेक्षा भारतीय जनता पक्षाच्या दृष्टीकोनातून आज अजितदादांची उपयुक्तता संपलेली आहे हे स्पष्ट दिसते आहे. त्यामुळे बोलत असताना आज दादांचे भान सुटत असल्याचे दिसून येत आहे. आर. आर. पाटील यांच्याविषयी बोलत असताना त्यांनी सही केलेल्या फाईलमुळे आपले आणि फडणवीस यांचे मधुर संबंध कसे विकसित होत गेले याची अप्रत्यक्ष कबुली देऊन 'हमाम मे सब नंगे' हे अजित पवारांनी दाखवून दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला महाभ्रष्टाचारी पक्ष असे संबोधणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी लक्षात घेतले पाहिजे की, याच पक्षाच्या पाटील यांनी भ्रष्टाचाराच्या चौकशीचे आदेश दिले होते, तर भारतीय जनता पक्षाने, अजित दादांना आपल्या सोबत घेऊन ही चौकशी थांबवली असल्याची बाब आता जनतेच्या लक्षात आलेली आहे. ज्या आरोपाबाबत ईडीजवळ काहीच पुरावा नव्हता अशा आरोपातील, आरोपींना ईडीने एक वर्षापेक्षा जास्त काळ तुरुंगात ठेवल्याचे दाखले आपल्याला देता येतील; परंतु सत्तर हजार करोडच्या घोटाळयाच्या फाईलवर आबा पाटलांची सही झालेली असताना पुढच्या काळात ही फाईल ईडीकडे सोपवणे फडणवीसांना का जमले नाही? ईडीकडे ही फाईल देण्यापेक्षा ती अजित पवारांना दाखवण्यामध्ये त्यांना जास्त स्वारस्य का वाटले? याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.

गेल्या अडीच वर्षांतील या सुप्रीम कोर्टाने ज्याला संपूर्ण असांविधानिक म्हणून घोषित केलेले आहे, अशा या सरकारचा हा काळ, हा महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीतील काळा अध्याय म्हणून ओळखला जाईल यात शंकाच नाही; परंतु आबा पाटलांनी ज्या आरोपांच्या चौकशीला हिरवा कंदील दाखवला होता ती चौकशी अशाप्रकारे बंद करून, अर्थातच सत्तर हजार करोड रुपयांचा घोटाळा दाबून आपल्या लाडक्या बहिणींना सरकारी तिजोरी लुटून पंधराशे रुपये देणारे हे तीन भाऊ, महाराष्ट्रातील बहिणींच्या कितपत पसंतीस उतरतील हे लवकरच आपल्याला दिसून येणार आहे.

अमरावती

## वास्तव

# नेत्यांनो 'जुबान को लगाम दो'!


अनंत बोरसे

9158495037


समाजाचे नेतृत्व करणाऱ्या, समाजाला दिशा देणाऱ्या राजकीय नेत्यांना झालेय तरी काय? सत्ताकारणाच्या अतिरेकापायी राजकारण्यांनी लोकशाहीची क्रूर चेष्टा तर चालवली आहेच; मात्र दिवसेंदिवस भाषेचा स्तरदेखील खालावत चालला आहे.

आजवर अनेक समाजधुरिणांनी देशाचे नेतृत्व केले, समाज घडवला, जनतेला दिशा दाखवली; मात्र कधीही आपल्या भाषेची मर्यादा सोडली नाही की पातळी सोडून वागले नाही. आपल्या राज्यव्यवस्थेत देशासाठी, जनतेसाठी, तन, मन, धन अर्पण करून, घर परिवाराचा त्याग करून आपले आयुष्य खर्ची घालणाऱ्यांची मोठीच परंपरा आहे, म्हणूनच जनतेमध्ये अशा व्यक्तींमध्ये कायमच आदराची भावना राहिली आहे. पूर्वी कोणत्याही नेत्यांबाबत बेताल, बेफाम, बेजबाबदार वक्तव्ये होत नसत. तो काळच वेगळा होता. एकमेकांचा सन्मान, आदर राखला जायचा. भाषेची मर्यादा ओलांडली जाणार नाही याची काळजी घेतली जायची. मात्र, दुर्दैवाने सत्तेची चव चाखायला मिळाली की भल्याभल्यांना सत्तेचा मोह आवरत नाही, आणि भल्याभल्यांची मती गुंग होते याचीदेखील काही कमी उदाहरणे नाहीत. पंचवीस- तीस वर्षांपूर्वी देशातील राजकारणी वेगळ्याच मानसिकतेतील होते, सत्ताकारणाच्या अतिरेकापायी राज्य व्यवस्था सर्व शक्तिमान बनल्याने लोकशाही देशात हुकूमशाही प्रवृती वाढू लागली आणि मी आणि मीच या प्रवृत्तीचा प्रभाव वाढू लागला व सत्ता एकवटून सतेचा दुरुपयोग वाढीस लागला. त्याबरोबरच राजकारण्यांची भाषादेखील बदलू लागली आहे. 'हम करे सो कायदा' प्रवृत्ती वाढीस लागून देशहित, जनहिताला तिलांजली दिल्या गेली. स्वार्थ शाहीचे राजकारण होऊ लागले, मग त्यासाठी पक्षीय चौकटीच्या पलीकडे जाऊन अनैतिक तडजोड होऊ लागल्या आणि मग सोयिस्करपणे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करताना एकमेकांचा उद्धार करताना भाषेचा स्तर खालची पातळी गाठू लागला आहे. अगदी सर्वोच्च नेत्यांपासून खालच्या कार्यकर्त्यापर्यंत भाषेचा स्तर घसरत चालला आहे हे देशातील आणि राज्या-राज्यांतील कटू सत्य आहे. आपण कुठल्या सांविधानिक पदावर आहोत, आपली जबाबदारी काय, आपल्या पदाची उंची काय, याचे भान विसरून बेताल वक्तव्ये करण्याची जणू चढाओढच लागली आहे. एकमेकांना जवळपास सगळ्याच प्राण्यांची उपमा देऊन झाले, ऐतिहासिक पुरुष, देवदेवतांचे अवतार संबोधन झाले, एकमेकांचा एकेरी उल्लेख, अवमानकारक भाषा, याची पुढची पायरी म्हणजे कोणी कोणाला भ्रष्टाचारी म्हणतो, तर कोणी कोणाचा वैफल्यग्रस्त म्हणून उल्लेख करीत आहे, तर कोणी कोणाला कोरोनाची उपमा देत आहे, तर प्रत्युत्तर म्हणून कोणी विरोधकांना फंगसची उपमा देत आहे. व्यक्तिगत द्वेषापायी देशाची प्रतिष्ठा पणाला लागणे हे फारच दुर्दैवी आहे. शरद पवार यांच्यावर टीका करताना सदाभाऊ खोत यांनी खालची पातळी गाठून वैयक्तिक टीका केली आणि यावरून अजितदादा पवार यांनी महायुतीच्या नेत्यांनाच इशारा दिला. सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर हे नेहमीच पवारांवर टीका करताना पातळी सोडून टीका करतात आणि त्यांना कोणीही आवरत नाही. अर्थात इतर राजकीय पक्षातदेखील असे वाचाळवीर आहेत, त्यांना वेसण घालण्याची कोणाचीच इच्छाशक्ती नाही की मानसिकता नाही. अगदीच अंगाशी आले, पक्ष अडचणीत आला की मला तसे म्हणायचे नव्हते, चुकीचा अर्थ लावला गेला, असे म्हणत दिलगिरी, माफी व्यक्त केली जाते आणि पुन्हा कालांतराने ये रे माझ्या मागल्या. गेल्या दहा वर्षांत तर सर्व पक्षीय वाचाळवीरांनी अतिशय खालची पातळी गाठली आहे. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना जणू परवानाच मिळाला असावा अशा पद्धतीने सत्ताधारी पक्षाचे अनेक नेते आपले पद, आपली पत याचे भान न बाळगता काहीही बरळत सुटले आहेत. कोणालाही ना कायद्याचा धाक ना शिक्षेची भीती.

सांविधानिक पदावरील कुठल्याही पक्षाची व्यक्ती ही व्यक्ती नसते तर ती देशाची, राज्याच्या जनतेचे प्रतिनिधित्व करणारी जबाबदार व्यक्ती असते. मात्र, दुर्दैवाने आज काही सांविधानिक पदावरील व्यक्तींकडूनच होणाऱ्या भाषेचा स्तर खालावत आहे हे देशाच्या किंवा राज्याच्या दृष्टीने योग्य नाहीच. पदाचा मान सर्वांकडून राखलाच गेला पाहिजे याची जबाबदारी सामान्य जनतेपेक्षा पदावरील व्यक्ती आणि सर्व पक्षांचे नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यावर तर अधिकच आहे. आपण राजकीय नेते आणि विशेषतः सत्ताधारी बनलो, की आपण सर्व ज्ञानी झालो आणि सर्व विषयांवर बोलण्याचा आपल्याला जणू हक्कच प्राप्त झाला आहे आणि आपण काहीही बरळलो, तरी आपले काहीच चुकत नाही या मानसिकतेतून नेते मंडळींनी बाहेर यायला हवे. 'यथा राजा तथा प्रजा' या उक्तीप्रमाणे जनता नेत्यांचे अनुकरण करते. अशावेळी आपण जनतेसमोर कुठला आदर्श निर्माण करत आहोत याचे भान सर्वांनीच बाळगण्याची गरज आहे.

अशा भाषेमुळे केवळ तेढच निर्माण होते आणि कटुता अधिकच वाढते आणि समाज जीवनाच्या दृष्टीने हे अतिशय चुकीचे आहे. जननेत्यांनी अशा मानसिकतेत बदल करायलाच हवा. देशाला नेतृत्व आणि दिशा देणाऱ्या सर्वांनीच याचा गांभीर्याने विचार करायला हवा. सार्वजनिक जीवनात भाषेचा स्तर राखला जायलाच हवा.

शहापूर, जि. ठाणे

## चळवळ

# 'मूकनायक' (पाक्षिक)


प्रा.डॉ. इसादास भडके

9096364886

erbfes@gmail,com


३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' हे पाक्षिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केले. 'बहिष्कृत भारत' (३ एप्रिल १९२७), 'जनता' (२४ नोव्हेंबर १९३०) व 'प्रबुद्ध भारत' (४ फेब्रुवारी १९५६) ही नियतकालिके बाबासाहेबांनी सुरू केली. १९२० ते १९५६ मधील काही कालखंड वगळला, तर बाबासाहेबांनी ३६ वर्षे पत्रकारिता केली. ही वृत्तपत्रे आंबेडकरी चळवळीचा एकमेव प्रामाणिक इतिहास होय. 'मूकनायक' या नियतकालिकाचे 'काय करू आता धरूनिया भीड। निःशक ते तोंड लाजविले नव्हे, जगी कोण मुकियाचा जाण। सार्थक लाजून नव्हे हित।' हे ब्रीदवाक्य होय. हे ब्रीदवाक्य संत तुकारामांचे असून त्यांच्या परखड विचारांची जाणीव करून देणारे आहे. 'मूकनायक'चे संपादक भटकर आणि घोलप असले, तरी त्यातील प्रारंभीचे संपादकीय लेख स्वतः बाबासाहेबांनी लिहिले होते. दलितांच्या मनात विचारजागृती निर्माण करून अन्याय-अत्याचाराविरुद्ध संघर्ष करण्याची जाणीव निर्माण करण्यास 'मूकनायक' यशस्वी ठरले. बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग, खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी खरी भूमी नाही,' असे बाबासाहेब 'मूकनायका'त म्हणतात, तसेच 'पंखाशिवाय जसा पक्षी, त्याप्रमाणे समाजात विचार प्रवृत्त करण्यासाठी वृत्तपत्राची गरज आहे.' असेही बाबासाहेब म्हणतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकार म्हणून भरीव कार्य केलेले आहे; पण प्रस्थापित वृत्तपत्रसृष्टीने पाहिजे त्या प्रमाणात दखल घेतली नाही. या संदर्भात 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथात म्हटले आहे की, 'एवढा कोरीव वृत्तपत्रीय प्रपंच करूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'पत्रकार' म्हणून कोणी मानाचा मुजरा केला नाही. मराठी वृत्तपत्रसृष्टी टिळक, आगरकर, परांजपे, केळकर, खाडिलकर, कोल्हेटकर येथेच कुठेतरी थांबत होती. लोकजागृतीचे कार्य करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम आहे, असे मानणाऱ्या आणि प्रत्यक्ष वृत्तपत्रसृष्टीचा प्रपंच करणाऱ्या बाबासाहेबांचा पत्रकार म्हणून निर्देश न करणे, त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनाचे मूल्यमापन न करणे, या बाबी अनवधानाने होत होत्या, असे म्हणणे अत्युक्तीचे ठरेल. काहींनी निर्देश करावा, पण तो अत्यंत जुजबी किंवा चुकीचा तरी.'

१९२० च्या कालखंडात जी उलथापालथ सुरू होती, त्या संदर्भात 'मूकनायक'ची उपयोगिता लक्षात घेता येते. 'मूकनायक'च्या पहिल्या अंकातील मनोगतपणा अग्रलेख महत्त्वाचा आहे. हा देश विषमतेचे माहेरघर आहे. या विषमतेचे स्वरूप अनेक प्रकारचे आहे. धार्मिक विषमता रक्तपात घडवू शकते. हिंदू धर्मातील विषमता काल्पनिक असून त्याला नकार देण्यासारखी आहे. 'हिंदू' समाज हा एक मनोरा आहे. म्हणून बाबासाहेबांनी जातीयतेच्या उतरंडीचे केलेले विवेचन त्यांच्या प्रगल्भ समाजशास्त्रीय दृष्टीकोनाचा परिचय घडविणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'मूकनायक' या पाक्षिकाकडून फार अपेक्षा होत्या. 'मूकनायका'साठी शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ५ जुलै १९२० ला पुढील शिक्षणाकरिता परदेशात गेले. या काळात 'मूकनायक'चे बारा अंक प्रकाशित झाले. बाबासाहेबांनी लंडनला जाण्यापूर्वी 'मूकनायक'ची जबाबदारी ज्ञानदेव घोलप यांना दिली. ६ मे १९२२ रोजी शाहू महाराजांचे निधन झाले. १४ एप्रिल १९२३ ला बाबासाहेब मुंबईला परत आले. तोपर्यंत 'मूकनायक' बंद पडले. 'मूकनायक' सुरू करण्याचा संकल्प बाबासाहेबांनी केला; पण ज्ञानदेव घोलप यांनी वाद निर्माण केला. हा वाद बाबासाहेबांना पटला नाही. १९२३ ला 'मूकनायक' बंद पडले. यामुळे बाबासाहेबांना प्रचंड मनःस्ताप झाला; पण 'मूकनायक'चे कार्य ऐतिहासिक आहे. 'मूकनायक'ने दलितांच्या आकांक्षा रुजविण्याचा पहिला प्रयत्न केला, त्याला तोड नाही. नव्या जाणिवा या नियतकालिकाने निर्माण केल्या. अस्पृश्यात अस्मितेची ज्योत प्रज्वलित केली, नव्हे ते प्रबोधनाचे प्रभावी आयुध ठरले. अंधाऱ्या रात्रीच्या गस्तवाल्यासारखे वृत्तपत्राचे कार्य आहे. अन्याय, अत्याचार वेशीवर टांगण्याची जबाबदारी नियतकालिके पार पाडीत असतात. वृत्तपत्राशिवाय अस्पृश्यांच्या भवितव्याचा विचार करता येणार नाही, असे बाबासाहेबांचे प्रांजळ मत होते. 'मूकनायक' व्यापक दृष्टीकोन ठेवून उदयास आले. बाबासाहेब 'मूकनायक' बंद पडल्यावर खचून न जाता नवा आयाम देण्याच्या दिशेने आणि दृष्टीने नवनवीन आयुधांचा वापर करू लागले. त्यासाठी संघटन आणि चळवळीची माध्यमे शोधली. मुख्यत्वे मानवतेला बाबासाहेबांना अधिष्ठित करावयाचे होते. 'मूकनायका'ने अस्पृश्यांसाठी नवे विचारयुग निर्माण केले. स्वजनोद्धारासाठी वृत्तपत्राचा प्रपंच करणारे आंबेडकर एक प्रकारे सजग प्रहरीच होते यात शंका नाही.

'मुक्ताई', आंबेकर ले आऊट,
पाण्याच्या टाकीजवळ, चंद्रपूर

## वाचक विचार मंच

देशातील सर्वोच्च पावसाचे ठिकाण म्हणून मेघालय राज्यातील चेरापुंजीची नोंद असल्याचे आपणास माहीत आहे. दरवर्षी जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत या भागात सरासरी नऊ हजार मिलीमीटर पाऊस पडतो. तथापि आणखी एक ठिकाण सर्वोच्च पावसाचे आहे याची नोंद मात्र अद्याप तशी झालेली नाही. ते ठिकाण म्हणजे रायगड व पुणे जिल्ह्यांना जोडणारा ताम्हिणी घाट होय. यंदा तेथे चार महिन्यांत तब्बल नऊ हजार ८०० मिलीमीटर पाऊस झालेला आहे. पुण्यातील ज्येष्ठ चार हवामान तज्ज्ञांनी याबाबतचा डेटा प्रसिद्ध केला आहे. त्यांनी ही माहिती रॉयल मेट्रोलॉजिकल सोसायटी या जगातील महत्त्वाच्या शोधपत्रिकेत दिली आहे. गेल्या सुमारे ३८ वर्षांचा डेटा त्यांनी

### ताम्हिणी घाट देशातील सर्वाधिक पावसाचे ठिकाण!

दिला आहे. मात्र, अद्यापपर्यंत त्याची नोंद हवामानाच्या इतिहासात घेतली गेलेली नाही, ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. २०१६ साली त्यांनी हे संशोधन हवामान खात्यापुढे मांडूनदेखील याची नोंद अद्यापपर्यंत घेतली गेली नाही ही आश्चर्याची घटना आहे. महाराष्ट्र सरकारने याबाबत दखल घेऊन या विक्रमाची नोंद हवामान खात्यात करण्यास साहाय्य करावे. हा एक विक्रम असून त्याची नोंद इतिहासात होणे आवश्यक आहे.

**शांताराम वाघ**, पुणे
मो. नं.: ९६२३४ ५२५ ५३
E mail: swagh30948@gmail.com

### शेती टिकली, तरच अर्थव्यवस्था बळकट होईल!

कांद्याचे भाव वाढले, की लगेच चिंता व्यक्त होते. चंगळवादी वस्तूंची नेहमीच भाववाढ होते त्यावर कोणी काही बोलत नाही. शेती टिकली, तरच अर्थव्यवस्था बळकट होईल याची जाणीव कमी होत आहे. हवामान बदलाने शेती करणे सोपे राहिलेले नाही. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेला अस्मानी-सुलतानी संकटांनी नेहमीच घेरलेले असते. शेतकरी हिताच्या योजना आखून काही एक घडणार नाही. खऱ्या अर्थाने त्यांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने होणे गरजेचे आहे.

**प्र.मु. काळे**, सातपूर, नाशिक
मो. नं.: ९२७३०४५७९४

## धूमधडाका

**ये क्या हुआ?**

हाच विचार करतो
निवडणुकीतील उमेदवार
शंभर टक्के मीच आहे
आता पुढचा आमदार

मुळीच माघार घेत नाही
निर्धार असतो पक्का
ज्याला त्याला वाटते
मीच हुकमाचा एक्का

पक्षाने तिकीट नाकारले
तर अपक्ष लढतो
चार-दोन समर्थक भेटताच
हरभऱ्याच्या झाडावर चढतो

चेलेचपाटे म्हणतात
साहेब! होऊ द्या खर्च
तुम्हाला काय कमी आहे?
चिक्कार आहे तुमच्या घरचं

स्वप्नांच्या झुल्यावर
झुलवतात स्तुतीपाठक
डल्ला मारणारेही करतात
निस्वार्थपणाचे नाटक

तुमचाच विजय निश्चित आहे
ह्याची देत राहतात हमी
उमेदवाराच्या फुग्यातील
हवा होऊ देत नाहीत कमी

मतदारांनी टाचणी मारताच
फुगा टचकन फुटतो
चेलेचपाटे फरार होतात
बिच्चारा आयुष्यातून उठतो

खर्च करून बर्बाद होतो
नशिबात उरते केकाटणे
तेलही जाते, तुपही जाते
हाती येते फक्त धुपाटणे

**ॲड. अनंत खेळकर**

## संवाद

# फटाके फोडण्याऐवजी पर्यावरण समतोल राखणे महत्त्वाचे....

'दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा' या उक्तीप्रमाणे हा सण संपूर्ण देशाच्या विविध भागांत विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या आनंदाने व उत्साहाने नुकताच साजरा केला गेला. दिवाळी हा सण म्हणजे एक औचित्य साधणारा सण आहे. या सणाला मोठमोठ्या आवाजाचे महागडे व इतर रोषणाई करणारे फटाके फोडले जातात त्यामुळे ध्वनिप्रदूषण, वायूप्रदूषण होते. यंदा वारेमाप फटाके फोडल्यामुळे मुंबई, ठाणे, दिल्ली या महानगरांच्या हवेचा स्तर दिवाळीदरम्यान प्रचंड खालावल्याचे समोर आले असून फटाक्यांच्या कागदामुळे सफाई कामगारांचे मोठे हाल उडाले. फक्त नवी मुंबईत फटाके, त्यांचे कागद, पुठ्ठे, कापड यांचा २० टन ६०० किलो कचरा जमा झाल्याचे वृत्त आहे. श्वासोच्छवास, डोळ्यांना गंभीर इजा होणे किंवा फटाक्यांनी भाजणे यांसारखे प्रकार घडतात. त्यामुळे असे प्रकार घडू नयेत म्हणून विविध संस्था, पर्यावरणवादी, मंडळे, शासन हे दरवर्षी आवाहन करतात. मात्र, त्याला हरताळ फासल्याचे दिसून येत आहे. सध्या निवडणुकीचा काळ असल्याने कोणाचाच अंकुश नाही. त्यामुळे फटाके मोठ्या प्रमाणात वाजवले जात असल्याचे दिसून आले असले, तरी वाढदिवस, थर्टी फर्स्ट, राजकारण्यांच्या विजयी मिरवणुका साजऱ्या करताना मोठ्या प्रमाणात मोठ्या आवाजाचे फटाके फोडून मोठा उन्माद दाखवतात. हे थांबले पाहिजे. सध्या ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषणचे प्रमाण वाढत असल्याने विविध आजारांनी जनतेला ग्रासले आहे. हे वास्तव नाकारता येत नाही. तरीपण अनेकजण फटाके फोडण्यात धन्यता मानतात. त्यासाठी सरकारने अशा कार्यक्रमावेळी फटाके फोडण्यावर निर्बंध घालून कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. फटाक्यांऐवजी पर्यावरण समतोल राखण्याचे व सामाजिक स्वास्थ्य जपण्याचे कार्य करणे महत्त्वाचे ठरेल!

**राजू जाधव,**
मांगूर, जि. बेळगांव

## गुल्लेर

# काय म्हनते हवा?


नरेंद्र इंगळे

9561226572


'कितीक टाईम आहे अजाबराव?'

'बस.. पाच- दहा मिनीट..'

'कधी गेला बुढा?'

'बुढा रातीच गेला.. सकाऊन मले फोन आला.. लय दिवसाचा बिमार होता बुढा..'

'येले झाल्यापेक्षा बरं झालं.'

'काय म्हनते तुमच्या भागात इलेक्शनची हवा?'

'आमच्या भागात शिंदेसेनेचा उमेदवार जोर मारुन राह्यला.. सीट त्याचीच निघते.'

'आमच्या इकडे कोनी वयखत नाही शिंदे सेनेले.. लोकं म्हनतात ते गद्दार पार्टी आहे.. गोहाटीले जाऊन खोके घेतले.'

'नाही हो.. शिंदेनं लाडकी बहीन आनली.. अडीच कोटी बायाचा फायदा करून देला.'

'मंग टॅक्स किती वाढोला? सगळी महागाई करून टाकली. एका मयन्याचं लाईनचं बील अडोतीसशे आलं मले.. राह्यते काय टकल्यावर केस?'

'डबल शिंदे मुख्यमंत्री होते; पाह्यजा तुम्ही.'

'झोपीत आहा काय? गेली हवा.. आता उद्धवभाऊचा चानस आहे.'

'अरे लाडक्या बहिनी शिवसेनेलेच मतं देतात.'

'असं समजू की अर्ध्या बहीनी देतीन.. लाडक्या भावासाठी काय केलं? फक्त घोषनाच केली की ग्रॅज्युएटले आठ हजार रुपये मयना देऊ.. लाडक्या बहिनीले पाच हजार दिवाळी बोनस देऊ..अमूक करु.. तमुक करु.. खरं काहीच नाही.'

'तो बुवा करतच होता..'

'मंग काहून केलं नाही?'

'मंधात आचारसंहिता लागली ना.. काहीच करता आलं नाही..'

'ते सोडा हो.. अडीच वर्षे तुमचा गळी मुख्यमंत्री होता.. इलेक्शनच्या वेळेवरच कशी लाडकी बहीन आठवली? आगुदर काहून याद नाही आली? आमचा गळी राहुलबाबा म्हनते दीळ हजारात काहीच होत नाही.. आम्ही तीन हजार देऊ.'

'सगळी तोंडाची वाफ आहे..'


'वाफ नाही.. आघाडीचं सरकार येऊ द्या.. शेतकऱ्याचं तीन लाख कर्ज माफ झाल्याशिवाय राह्यत नाही.'

'ओ अजाबराव.. बस करा तुमचा विषय.. मौतीवर आले की भांडाले आले? बुढा नेला तिकडे स्मशानात.. तुम्ही इकडेच माजोन करत बसले.. चला लवकर..'

# तुम्हाला नेटकचं नाटक आठवतंय ?

पब्लिक मेमरी ही खरोखरच शॉर्ट असते. महिन्याभरापूर्वी घडून गेलेला एखादा इव्हेंट अथवा एखादे नाटक महिन्याभरानंतर आपण विसरलेले असतो. विद्यार्थ्यांना मात्र ही मुभा नाही. पूर्वी वर्षभरात शिकवलेला सारा अभ्यासक्रम परीक्षेसाठी तरी लक्षात ठेवणं भाग असायचं, पण आता सेमिस्टर सिस्टिम आली आणि वर्षभराचं लक्षात ठेवणं सहा महिन्यांवर आलं. कंपल्सरी पाठ करायला लागणारे पाढे गेले, कविता नामशेष झाल्या, देवघरातून पर्वचा, तर कधीच हद्दपार झाला. खरंतर पर्वचा म्हणजे काय? हे आपल्यापैकी काही वाचक नक्की गुगल करून पाहतील. त्यामुळे एकंदर पाठांतरीत स्मरणशक्ती आपल्या स्मृतीपटलावरून हळूहळू लोप पावत चाललीय. आम्हां नाटकवाल्यांमध्ये या पाठांतराला अनन्य साधारण महत्त्व आहे. नाटक हे "बाय हार्ट" केल्याशिवाय होऊच शकत नाही, म्हटल्यावर आजच्या उगवत्या पिढीतल्या ५० टक्के कलाकारांनी या माध्यमाच्या वाटेला न जाण्याचे ठरवलेलेच असते. म्हणजे नव्या पिढीत नाटक रुजत नाहीये म्हणून जी बोंब मारली जातेयं, त्याचा उगम आणि एक सबळ कारण पाठांतर आणि शॉर्ट मेमरी यात सापडते. पल्लेदार संवादाची नाटकं आणि त्या नाटकातील स्वगतं सुद्धा लोप पावली आहेत. मध्यंतरी मराठीतील हाऊसफुल्लचे बोर्ड मिरवणाऱ्या एका नटाने चक्क पाठांतर कोण करेल ? या 'कटकटी'पायी नाटक नाकारल्याचे कानावर आले होते. असे एक ना अनेक चुकीचे पायंडे पडत पडत मराठी रंगभूमी पुढे जाते आहे. मी मागील एका लेखामध्ये संहितांमधून वापरल्या जाणाऱ्या चित्रपटसंमत टर्मिनॉलॉजी नाटकातून वापरल्या जाऊ लागल्याबद्दल कडाडून विरोध केला होता. हल्ली बऱ्याच लेखकांच्या संहितेत मॉण्टाज हा शब्द येतो. काय असतो हा मॉण्टाज? तो कुठे वापरावा लागतो? मॉण्टाजचे संहितेच्या आनुषंगाने परीणाम स्वरूप वापर नैतिक आहे का ?... तर, हे सर्व प्रश्न गेले खड्ड्यात, एकांकिकेला बक्षीस मिळालं ना ? मग बाकी कशाचा विचारच करायचा नाही. पण एक गोष्ट मान्य करावीच लागेल की, एकंदर चित्रपट माध्यमाचा परिणाम जसा समाजमनावर होतो तसा तो






नाटकांच्या संहितांवर सुद्धा झालाय. मॉण्टाजेस सारखे अवाजवी सिनेप्रयोग आले. व्हिज्युअल्सना महत्त्व आले, संवादांची लांबी चित्रपटांच्या संवादांप्रमाणे कमी झाली; परंतु याने साध्य काय झाले? नाटक या माध्यमाला कॅमेरा, तर जोडला गेला नाही? शक्य असतं तर ते ही करायला मागे पुढे पाहिले नसते, या अज्ञानी आणि उतावळ्या आजच्या तरुण नाटककारांनी. माध्यमांतरावर अनेक विद्वानांचे ऐकून घेतील; पण शेवटी स्वतःला हवे तेच करून नाटकाची भाषा बिघडवायला सुरुवात झाली आहे. नाटकाच्या सादरीकरणाची एक भाषा असते, जी दिग्दर्शक वापरत असतो. आज अनेक नाटके रंगभूमीवर अशी अवतरली आहेत. ज्यात प्रत्येकाच्या सादरीकरणाची स्वतंत्र भाषा आहे...! म्हणजे नट मंडळी एखादे नाटक असेच सादर व्हायला हवे, असे स्वतःच ठरवून तसा प्रयत्न सुरू करतात, दिग्दर्शक स्वतःची भाषा बोलू लागतो. संगीत स्वतःची भाषा बोलते आणि उरल्या सुरल्या बाकी तांत्रिक बाबी स्वतःची भाषा बोलत असतात. इथे भाषा म्हणजे स्टाईल किंवा पद्धती ही संज्ञा अभिप्रेत आहे, हे लक्षात घ्यावे. या सर्व भेसळीमुळे "आमचे नाटक थोडे सिनेमॅटीक आहे" अशी पुस्ती नाट्यसूत्रांद्वारे ऐकू येऊ लागली आहे. हे सर्व आठवण्याचे कारण काय, तर तुम्हाला मोगरा नामक ऑनलाईन नाट्यप्रयोग आठवतो? कोविड काळात मराठी नाट्यकर्मींनी एकत्र न येता एकत्र येऊन केलेला नाट्यप्रयोग विसरलात? सुरुवातीलाच म्हटलं नव्हतं की पब्लिक मेमरी ही नेहमीच शॉर्ट असते म्हणून ...! कोविड काळात नाटक जगावे म्हणून केलेला "नेटकं" नावाचा तो आगळा वेगळा प्रयोग होता म्हणे. आता कुठाय ते नेटकं ? संपलं, आटलं, विरघळलं, लोप पावलं ..काय झालं काय त्या नेटकचं ? पाच स्त्री कथांच पाच नामवंत नट्यांनी, हृषिकेश जोशी दिग्दर्शित प्रत्येकीने आपापल्या घरुन मोबाईल किंवा हायएण्ड कॅमेऱ्यावरून सलग असा तो एकपात्री नाट्यप्रवेशास तद्दन प्रेक्षकांना फसवून केलेला तो ऑनलाईन "प्रयोग" होता. या मोगरा नामक नेटकचे म्हणे २२/२३ प्रयोग झाले. म्हणजे लोकांनी ऑनलाईन तिकिटांचे पैसे भरून असले थुकरट प्रयोग पाहिले असतील, का काही प्रेक्षक वेबसिरीज आणि चित्रपटांकडे वळणार? बरं हे फक्त आणि फक्त मराठीतच घडलं. हिंदी, गुजराती प्रेक्षक जे दिसेल त्यावर कोविड काळात समाधान मानत होते. पण आपल्या आरंभशूर मराठी नाट्यकर्मींनी कोविडकाळ संपताच, नेटकंवर पडदा टाकला. त्यावेळी मी आणि माझ्यासारखे अनेक ब्लॉगर्स परोपरीने सांगत होतो की ही नाटकाची भाषा नाही, नाटकाच्या नावाखाली माध्यमांतर होतंय. तुम्ही दुसरं तिसरं काही नाही, चित्रिकरणरूपात नाटक सादर करताय, ज्याला नाटकाच्या थिएटरचा फिल येणे शक्य नाही. कारण नाटक या माध्यमाची जादूच निराळी आहे. त्यात बाकीच्या माध्यमांची टर्मिनॉलॉजी घुसडू नका. रतन थिय्याम सारखा नाट्यमहर्षी आयुष्यभर हेच सांगत राहिला. याच कोविड काळात जगात तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या इकोल मॉडियाल या शाळेतल्या मुलांना मी आणि प्रमोद शेलारने लोककला सादरीकरणातून शिकवण्याचा प्रयत्न केला. अनेक क्लासेस घेतले, भरपूर पैसेही मिळाले; परंतु ऑनलाईन नाट्यकला किंवा नाटक करता येते असे जे म्हणतात, ते प्रथम स्वतःला फसवतात आणि नंतर जगाला. नेटकंच्या वेळी "हेच ते पुढील पिढीचे नाटक, हेच प्रयोग सर्वांगीण नाटकांचा विकास घडवतील" म्हणून जी बोंब मारली गेली, ती विरली ? उगाच कुठल्याच माध्यमाचा विचार न करता ऑनलाईन नाटकांचा केलेल्या प्रयोगामुळे उदयास येणाऱ्या नव नाट्यकर्मींवर नाटकाच्या संरचनेबाबत अत्यंत घातक संस्कार या अर्धवट नेटककारांनी केलेत, ज्याला कधीही नव्हता, शेंडा वा बुडखा. बिघडलेल्या मराठी नाटकांचे खरे दोषी तेच आहेत, जे आम्ही नाटक पुढे नेत असल्याचा अविर्भाव आणून नाट्यकर्मींची दिशाभूल करत आहेत.



भालचंद्र कुबल
पाचवा वेद



# ‘राजं संभाजी’ गाणं प्रेक्षकांच्या भेटीला

संदीप रघुनाथराव मोहिते-पाटील प्रस्तूत व उर्विता प्रॉडक्शन निर्मित ‘धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज’ चित्रपटातील बहुप्रतीक्षित टायटल साँग ‘राजं संभाजी’ आता रसिकांच्या भेटीस आले आहे. हा चित्रपट हिंदी आणि मराठी दोन्ही भाषेत प्रदर्शित होणार आहे. हे गाणं नंदेश उमप यांनी गायले असून मोहित कुलकर्णी यांचे संगीत आहे व गाण्याचे गीतकार हृषिकेश झांबरे आहेत.

हे गाणं आपल्या राष्ट्रवीर आणि हिंदवी स्वराज्याचे संरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित असून, त्यांच्या शौर्याचा आणि बलिदानाचा गौरव साजरा करतो. या गाण्यात उत्तम कलाकारांची तगडी फौज आहे ज्यामध्ये ठाकूर अनुप सिंग, अमृता खानविलकर, किशोरी शहाणे, भार्गवी चिरमुले, आणि मल्हार मोहिते-पाटील हे महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. धर्म आणि स्वराज्यासाठी समर्पित असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय कार्याची गाथा या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. ‘राजा संभाजी’ हे गाणं महानायकाच्या शौर्याला सन्मान देणारे ठरेल. संदीप रघुनाथ मोहिते पाटील प्रस्तूत व उर्विता प्रोडक्शन निर्मित ‘धर्मरक्षक महावीर संभाजी महाराज’ चित्रपटाची निर्मिती शेखर मोहिते पाटील, सौजन्य निकम आणि केतन राजे भोसले यांनी केली आहे.



# 'यहाँ के हम सिकंदर'! (भाग २)

बालरंगभूमी परिषद, मुंबई यांच्यातर्फे महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये ऑक्टोबर महिन्यात दिव्यांग महोत्सव साजरा झाला. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक दिव्यांग कलाकारांना व्यासपीठ मिळाले. त्यांच्या शाळांची आणि संस्थांची माहिती जनतेला झाली. ठाण्यामध्ये हे संमेलन करण्यासाठी आमच्या कमिटीने काम सुरू केले तेव्हा दिव्यांग मुलांच्या शाळांबद्दल आणि संस्थांकडून त्यांच्या प्रगतीसाठी केल्या जाणाऱ्या कार्याबद्दल आम्हाला थोडीफार माहिती होती. अशा संस्थांमधे प्रशिक्षित शिक्षक त्यांचा सांभाळ करतात. काही पालक संस्थांमध्ये, तर अशा मुलांच्या निवासाचीही सोय असते. ठाणे आणि आसपासच्या शाळांची माहिती आम्ही संमेलनानिमित्त मिळवत गेलो.

प्रगती अंध विद्यालय-बदलापूर, जिजाऊ अंध व मतिमंद मुलांची शाळा-पालघर या शाळांमध्ये गायन वादन कलांचे शिक्षण दिले जाते. आज प्रगती अंध विद्यालयात पंच्याहत्तर विद्यार्थी १ ली ते १०वी शिक्षण घेत आहेत. या शाळेतील एक विद्यार्थ्याने 'टाय अँड डाय' या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळवले.

ठाण्यातील प्रसिद्ध 'जिद्द' शाळेत विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने वेगवेगळी शिबिरे आयोजित केली जातात. वैद्यकीय शिबिरे हा या शाळेचा अविभाज्य भाग आहे. 'चैतन्य' मतिमंद मुलांची शाळा ही मुलांची उद्योगशाळा आहे. येथे पदाधिकारी व कर्मचारी सर्व स्त्रियाच आहेत. या शाळेत थालीपीठ भाजणी, बेसन पीठ ते अगदी शिकेकाई पावडरपर्यंत उत्पादने तयार करायला दिव्यांग मुले झटत असतात. त्यांना कुवतीप्रमाणे स्टायपेंड दिला जातो.

'सोबती पेरेंट्स असोसिएशन' ही वाडा येथे बहुविकलांग मुलांची शाळा आहे. त्यांचे वसतिगृह तिळगा गावी आहे. येथेही मुलांना व्यवसाय शिक्षण मिळते. तीव्र व्यंग असलेल्या मुलांच्या संगोपनासाठी पालकांना मदत व्हावी. या हेतूने ही संस्था काम करते.

'रेनबो फाऊंडेशन, बदलापूर' येथे मुलांच्या तब्येतीची विशेष काळजी घेतली जाते. गेल्या वर्षी त्यांनी पस्तीस विद्यार्थ्यांना 'मेनस्ट्रीम स्कुलिंग प्रोग्रॅम' (मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश) साठी तयार केले. तसेच कागदी लिफाफा बनविण्यापासून ड्रोन बनविण्यापर्यंत अनेक गोष्टींचे प्रशिक्षण त्यांना दिले जाते. 'कमलिनी कर्णबधिर विद्यालय', ठाणे येथे कला व्यवसायाच्या माध्यमातून विद्यार्थी विकास साधला जातो.



दिव्यांग कलामहोत्सवानिमित्त

‘एमबीए फाऊंडेशन’ ही संस्था शारीरिक किंवा बौद्धिकदृष्ट्या विशेष मुलांसाठी काम करते. मुलांची शारीरिक व बौद्धिक क्षमता वाढवण्यापासून ते नोकरीक्षम वयाच्या मुलांना मुख्य प्रवाहात उभे होण्यासाठी ही संस्था मदत करते. ज्यूट, कागद व कापडापासून सुंदर व कलात्मक पिशव्या बनवायला येथील मुलांना शिकवले जाते. 'आस्था आरोग्यसेवा' या संस्थेत स्पीच थेरपी, ऑक्युपेशन थेरपी दिली जाते. तसेच हे निवासी अभ्यासकेंद्रदेखील आहे.

'विश्वास' मतिमंद मुलांसाठी असलेल्या केंद्रात चित्रकला, नृत्यकला, नाट्यकला यांचे प्रशिक्षण दिले जाते.

'चाईल्ड ॲण्ड यू' ही संस्था स्वमग्न तसेच विकलांग मुलांसाठी काम करते. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक क्षमतेचा शोध घेऊन त्यांची प्रगती घडवून आणते.

'संतोष इन्स्टिट्यूट फॉर मेंटली चॅलेंज्ड' या संस्थेत पालकांच्या गरजेनुसार मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी त्यांनी शाखा निर्माण केल्या. सांताक्रूझ, कांदिवली, मीरारोड, डोंबिवली, सीवूड, गोरेगाव, बेलापूर इत्यादी ठिकाणी यांच्या शाखा आहेत. शाळांची माहिती घेताना मला मनीषा सिलम नावाची एक कवयित्री मैत्रीण भेटली. तिने 'राजहंस' ही संस्था स्थापन केली होती. तिचा स्वतःचाच मुलगा स्वमग्न आहे. त्यामुळे अशा मुलांसाठी तिने 'राजहंस' फाऊंडेशन स्थापन करून त्या मुलांना सांभाळणे व कलागुणांचे शिक्षण देणे सुरू केले. ऑटिझम विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अनेक उपक्रम राबवणे, पालकांना मार्गदर्शन करणे इत्यादी कामे या संस्थेतर्फे केली जातात. तसेच संस्थेचे वोकेशनल सेंटर ८ वर्षांपासून कार्यरत आहे.

'आत्मन अकादमी' ही एक अद्वितीय संस्था आहे. जी विशेष सूचनांद्वारे मुलांच्या वैयक्तिक शिक्षणाच्या गरजा पूर्ण करते. या विद्यार्थ्यांना शिक्षण सुविधा देणारे, विशेष शिक्षक, थेरपिस्ट आणि प्रशिक्षित व्यावसायिकांचे अशा पंचवीस जणांचे मार्गदर्शन मिळते आहे.

कर्णबधीर मुलेदेखील किती प्रगती करू शकतात, याचे उदाहरण म्हणजे 'जव्हेरी ठाणावाला' शाळा. नॉर्मल शाळेतील अभ्यासक्रम या शाळेत राबविला जातो. विशेष म्हणजे या शाळेतील विद्यार्थ्यांनी अबॅकसच्या स्पर्धेमध्ये राज्यस्तरीय सुवर्णपदके पटकावली आहेत. 'जागृती' ही बौद्धिक सक्षम नसलेल्या प्रौढ व्यक्तींसाठी स्थापन झालेली व पालकांनी चालवलेली संस्था आहे. पर्यावरण पूरक वस्तूंची निर्मिती तसेच क्षमताधिष्ठित कौशल्य विकास असे प्रेरक कार्यक्रम राबविले जातात. समाजामध्ये सन्मानाने स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी विशेष व्यक्तींवरती विविध कार्यक्रमाचे आयोजन करून संस्कार केले जातात.

'आस्था आरोग्य सेवा आणि शिक्षण केंद्र' बदलापूर हे केंद्र दिव्यांग मुलांसाठी विशेष शिक्षण कार्यक्रम प्रदान करत आहे. या संस्थेत स्पीच थेरपी, ऑक्युपेशन थेरपी, ऑटिझम इंटरव्हेंशन आणि प्रशिक्षण दिले जाते. दिव्यांग मुलांच्या पालकांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात.

ठाणे महानगरपालिका शाळा क्र. ६२ ही शाळा घोडबंदर रोडवर कासारवडवली येथे आहे. या शाळेत सामान्य मुलांच्या बरोबरीने दिव्यांग मुलांनाही प्रवेश दिला जातो. सामान्य मुलांबरोबर शिकल्यामुळे या मुलांचा आत्मविश्वास वाढतो. ही मुले वयाच्या अठराव्या वर्षांपर्यंत शिकू शकतात. पण त्यानंतर मात्र पालक संचालित किंवा इतर खासगी संस्थांमध्ये त्यांना दाखल व्हावे लागते. प्रत्येक मुलाची वेगवेगळी गरज व क्षमता ओळखून त्याप्रमाणे त्या मुलांची प्रगती घडवून आणावी लागते. ही मुले पुढे मुख्य प्रवाहातही येऊ शकतात. थोड्या प्रमाणात का होईना, अर्थार्जन करू शकतात. वेगवेगळ्या कला शिकून आपले जीवन सुंदर करू शकतात.



फिरता फिरता
मेघना साने

meghanasane@gmail.com

# संसाराच्या पाणीपुरीमध्ये सगळ्या ‘चवी’

ही मराठवाड्याची मानसकन्या म्हणून लोकांनी गौरवलेली व विनोदाची उत्तम जाण असलेली, आपल्या एन्ट्रीने प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारी अभिनेत्री म्हणजे प्राजक्ता हणमघर. दादरच्या शारदाश्रम शाळेत तिचे शालेय शिक्षण झाले. गॅदरिंगच्या वेळी तिच्या शाळेत नाट्यस्पर्धा असायची, त्यावेळी नाटकात तिने काम केले होते. तिचे लहान पणापासून प्रसिद्ध होण्याचे स्वप्न होते. तिथून तिला नाटकाविषयी प्रेम निर्माण झाले. त्यानंतर तिने रुईया कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथे नाट्य स्पर्धेत तिने भाग घेतला. श्रीरंग गोडबोले यांची ‘घडलंय बिघडलंय’ ही तिची पहिली मालिका होती. त्यानंतर तिने श्रीरंग गोडबोले यांच्या अनेक मालिकेमध्ये काम केले.

'कॉमेडीची बुलेट ट्रेन' ही मालिका तिच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरली. त्यामध्ये ती मराठवाड्यातील बोली भाषा सादर करायची. खरंतर तिचे कुणीही मराठवाड्यात नाही, तरीदेखील त्या बोलीभाषेमुळे तिने प्रेक्षकांची मने जिंकली होती. प्रेक्षकांनी तिला मराठवाड्याची बुलेट असे देखील म्हटले आहे. तिला मराठवाड्याची मानस कन्या देखील म्हटले जाते.

त्यानंतर ‘तिने बस्ता’, ‘धुरळा’, ‘लूज कंट्रोल’, ‘गोष्ट एका पैठणीची’, ‘हवा हवाई’ हे चित्रपट केले. या वर्षात तिचा ‘राजकारण गेलं मिशित’, ‘लेक असावी अशी’ हे चित्रपट रिलीज झाले. ‘पाणीपुरी’ हा तिचा नवीन चित्रपट लवकरच रिलिज होणार आहे. या चित्रपटामध्ये आर्ची हे तिच्या व्यक्तिरेखेचे नाव आहे. अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या पत्नीची भूमिका तिने साकारली आहे. सगळ्या नवरा-बायकोमधील संबंध प्रातिनिधिक स्वरूपात त्याच्यात पाहायला मिळणार आहे. पाणीपुरीमध्ये जशा सगळ्या चवी असतात. त्याप्रमाणे नवरा बायकोच्या नात्यामध्ये सगळ्या चवींचा समावेश असतो. ते नाते कधी गोड असते, कधी तिखट असते, तर कधी कडू असते. जसे पाणीपुरीमध्ये सगळ्या चवी एकत्र आल्या, तर ती रुचकर लागते, त्याप्रमाणे संसारामध्ये समतोल साधला, तर तो चांगला होता. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच आवडेल असा आशावाद तिने व्यक्त केला. कारण प्रेक्षकांच्या दैनंदिन जीवनातील प्रश्न यामध्ये पाहायला मिळेल. प्रेक्षक स्वतःला या चित्रपटाच्या कथेत पाहतील. नवरा-बायको हा समाजाचा स्थायीभाव आहे. प्रेम आपल्याला जन्मतःच मिळालेले असते. लग्नसंस्था आपणच निर्माण केलेली आहे. ती आनंदी करण्याचे आपल्याच हाती असते, असे तिचे म्हणणे आहे. या चित्रपटामध्ये दोन गाणी आहेत.

रंजना ही तिची आवडती अभिनेत्री आहे. तिच्या सारख्या भूमिका करायला मिळाव्यात असे तिला वाटते. तिला वाचन, स्वयंपाक करायला, फिरायला आवडते, नवीन लोकांना भेटायला आवडते. आयुष्यात ज्या गोष्टी केल्याने आपण पुढे जाऊ शकतो, त्या गोष्टी करायला तिला आवडतात, तेच तिचे छंद आहेत. आगामी ‘पाणीपुरी’ या चित्रपटाच्या यशासाठी तिला हार्दिक शुभेच्छा!



टर्निंग पॉइंट
युवराज अवसरमल





प्राजक्ता हणमघर

मराठी रंगभूमीवर विविध प्रकारच्या नाट्यकृती सातत्याने येत असतात. कौटुंबिक, सामाजिक, ऐतिहासिक, विनोदी, आध्यात्मिक, रहस्यमय, वैचारिक आदी पठडीतली नाटके रंगभूमी गाजवत असतात. यापैकी विनोदी बाजाची नाटके म्हणजे हमखास मनोरंजनाची हमी, हे सूत्र ठरलेले आहे. विनोदी नाटकांचे एक अंग असलेला 'फार्स' हा नाट्यप्रकार, तर रंगभूमीवर धुमाकूळ घालतोच. याच मांदियाळीत आता 'बाप कुणाचा ताप कुणा...!' या 'फार्स'ने आता रंगभूमीवर 'एन्ट्री' घेतली आहे. श्री शिवाजी मंदिरात या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग मोठ्या उत्साहात रंगला आणि आता हे नाटक सर्वत्र धुमाकूळ घालण्यास सज्ज झाले आहे.

'बाप कुणाचा ताप कुणा...!' हे नाटक रंगभूमीवर 'एन्ट्री' घेतानाच सोबत अनेक वैशिष्ट्ये घेऊन आले आहे. नाटककार श्रीनिवास भणगे यांनी हे नाटक लिहिले आहे आणि कुमार सोहोनी यांनी हे नाटक दिग्दर्शित केले आहे. दिग्दर्शक या नात्याने कुमार सोहोनी यांचे हे १२० वे नाटक आहे. बऱ्याच कालावधीनंतर त्यांनी रंगभूमीवर 'फार्स' हा प्रकार हाताळला आहे. याविषयी बोलताना कुमार सोहोनी म्हणतात, "ही माझी १२० वी कलाकृती आहे, याचा मला अभिमान वाटतो. मी वेगवेगळ्या पद्धतीची नाटके आतापर्यंत केली असली, तरी विनोदी पद्धतीची नाटके फार कमी केली आहेत. हे नाटक



# ‘बाप कुणाचा ताप कुणा...!’

## नाटकाची रंगभूमीवर ‘एन्ट्री’...

म्हणजे 'फार्स' आहे. १९८७ मध्ये मी 'वासूची सासू' हा 'फार्स' केला होता आणि त्याच्यानंतर मी आता पुन्हा एकदा 'फार्स' घेऊन आलो आहे. श्रीनिवास भणगे यांनी अतिशय उत्तम असा हा 'फार्स' लिहिलेला आहे. माझे भाग्य असे की संतोष पवार याच्यासारखा नट या नाटकाच्या निमित्ताने माझ्यासोबत आहे".

या नाटकात ज्येष्ठ मंडळींपासून नव्या पिढीपर्यंतच्या कलावंतांची फळी काम करत आहे. विजय गोखले व संतोष पवार या दोन हरहुन्नरी कलावंताची जोडी या नाटकाच्या निमित्ताने एकत्र आली आहे. या रंगकर्मींना नाटकांचा प्रदीर्घ अनुभव आहे आणि त्याचा फायदा अर्थातच या नाटकाला होत आहे. त्यांच्यासोबत धनश्री काडगावकर हिची हटके भूमिका या नाटकात आहे. साधारण आठ वर्षांनंतर ती पुन्हा एकदा रंगभूमीकडे वळली आहे. त्यामुळे तिचे या नाटकातले अस्तित्व हा या नाटकाचा आकर्षणाचा भाग ठरला आहे. या कलावंतांसोबत प्रशांत निगडे, वरदा साळुंके, श्रुती पुराणिक व दुर्गेश आकेरकर हे कलाकार या नाटकात महत्त्वाच्या व्यक्तिरेखा साकारत आहेत. या नाटकात भूमिका रंगवत असलेला संतोष पवार म्हणतो, "या नाटकात मी फक्त एक कलाकार म्हणून काम करतोय. कुठल्याही कलाकाराची इच्छा असते की, वेगवेगळ्या दिग्दर्शकांकडे काम करावे.

तशी कुमार सोहोनी यांच्यासोबत काम करण्याची माझी इच्छा होती. आम्ही बरेच दिवस एकत्र काम करण्याचा प्रयत्न करत होतो आणि हा योग आता या नाटकाच्या निमित्ताने जुळून आला आहे. हे नाटक म्हणजे अतिशय धमाल अशी कॉमेडी आहे".

या नाटकाच्या निमित्ताने पुन्हा एकदा रंगभूमीवर सक्रिय झालेली धनश्री काडगावकर सांगते, "खूप वर्षानंतर मी एक धमाल आणि हटके नाटक घेऊन आले आहे. यात मी 'रोमा' हे पात्र रंगवत आहे. हे नाटक करताना मला खूप काही शिकायला मिळत आहे आणि हे नाटक मी एन्जॉय करतेय". तर, एकूणच या नाटकाविषयी बोलताना विजय गोखले म्हणतात, "या नाटकातली माझी भूमिका खळखळून हसवणारी आहे; डोक्याला ताप देणारी नाही.

हे नाटक विनोदी बाजाचे असल्याने रसिकांनीही डोक्याला ताप करून घेऊ नये. रसिकांनी नाटकाला यावे आणि खळखळून हसत नाटकाचा मनमुराद आनंद घ्यावा". ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांनी या नाटकाला संगीत दिले आहे. नाटकाचे नेपथ्य राजन भिसे यांनी केले आहे.

कुमार सोहोनी यांची प्रकाशयोजना, पूर्णिमा ओक यांची वेशभूषा आणि किशोर पिंगळे यांची रंगभूषा या नाटकाला लाभली आहे. निर्माते सचिन व्ही. यू. यांनी हे नाटक रंगभूमीवर आणले आहे. सी. टी. निर्मित व स्मित हरी प्रॉडक्शन्स प्रकाशित 'बाप कुणाचा ताप कुणा...!' हे नाटक शुभारंभापासूनच रंगभूमीवर धमाल उडवत असल्याची चर्चा नाट्यसृष्टीत रंगली आहे.



राजरंग
राज चिंचणकर

# बहुप्रतीक्षित 'गुलाबी' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

येत्या २२ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होणाऱ्या ‘गुलाबी’ चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. नुकताच या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर आणि म्युझिक लाँच सोहळा पार पडला. गुलाबी थीम असणाऱ्या या सोहळ्यात चित्रपटाची संपूर्ण टीम सहभागी झाली होती. यावेळी ‘गुलाबी’च्या मॅशअपवर लहानग्यांनी सुंदर सादरीकरणही केले. गुलाबी नगरी, जयपूरच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या तीन स्त्रियांच्या मैत्रीचा हा प्रवास प्रेक्षकांच्या हृदयाला स्पर्श करणारा ठरणार आहे. तीन मैत्रिणींच्या मैत्रीचा प्रवास आणि त्यांच्या स्वप्नांची सफर दर्शवणारा हा कमाल ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून एकत्र आलेल्या या तीन मैत्रिणी कशा आपल्या आयुष्यातील संघर्षांना सामोरे जातात आणि मैत्रीतून जगण्याची एक वेगळी दिशा शोधतात, हे या ट्रेलरमधून पाहायला मिळत आहे.

'गुलाबी' ही कथा फक्त मैत्रीची नसून, त्यांच्या वैयक्तिक संघर्षांची आणि आत्मसन्मानाच्या शोधाची गोष्ट आहे. या प्रवासात श्रुती मराठे, अश्विनी भावे आणि मृणाल कुलकर्णी यांच्या भूमिका मुख्य आहेत. तिघींच्या प्रवासाची रंगमय झलक ट्रेलरमध्ये दिसत असतानाच जयपूरमधील विविध रंगांचे आणि सौंदर्याचे दर्शनही घडत आहे. अभ्यंग कुवळेकर यांनी दिग्दर्शित 'गुलाबी' या चित्रपटाची निर्मिती सोनाली शिवणीकर, शीतल शानभाग, अभ्यंग कुवळेकर आणि स्वप्नील भामरे यांनी व्हायोलेट फ्लेम मोशन पिक्चर्सच्या बॅनरखाली केली आहे. या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी, शैलेश दातार, आणि निखिल आर्या यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. संगीतकार साई-पियुष यांचे संगीत चित्रपटाच्या भावनांना आणखी उजळवते, ज्यामुळे ही कथा प्रेक्षकांना अधिक भावते.



# रिपाइं पूर्ण ताकदीने पाठीशी

## रणधुमाळी — पप्पू कागदे यांनी दिली ग्वाही

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजप, रिपाइं महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्या (आठवले गट) कार्यालयास शनिवारी (दि.१५) भेट देवून युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्याशी चर्चा केली. यावेळी युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी ताकद उभी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महायुतीचा प्रमुख घटक पक्ष म्हणून रिपाइं पूर्ण ताकदीनिशी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभी राहिल्याने डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पारडे जड झाले आहे. या बैठकीस महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी जैतुल्ला खान, नसीर अन्सारी, नगरसेवक प्रेम चांदणे, अशोक वाघमारे, आर.पी.आय.चे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड, तालुकाध्यक्ष किसन तांगडे, युवक जिल्हाध्यक्ष महेश आठवले, युवक तालुकाध्यक्ष सुभाष तांगडे, शहराध्यक्ष अविनाश जोगदंड, युवक शहराध्यक्ष भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, धम्मा पारवे, बापू पवार आदी उपस्थित होते. प्रभाकर चांदणे, मायाताई मिसळे, नवनाथ डोळस, राजाभाऊ वक्ते, भास्कर जावळे, मच्छिंद्र निकाळजे, रामेश्वर खळगे, दयानंद उबाळे, नामदेव वाघमारे, भिमराव घोडराव, अविनाश जोगदंड, विजय ओव्हाळ, श्रीमंत जाधव, कैलास जोगदंड, प्रा.आनंद मोरे, भैय्यासाहेब मस्के यांच्यासह रिपाइंच्या जिल्हा कार्यकारणीचे सर्व पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### डॉ.योगेश क्षीरसागरांनी मानले आभार!

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भाजप, शिवसेना, रिपाइं., एस.आर.पी. व मित्रपक्षांच्या महायुतीचा बीड विधानसभेचा अधिकृत उमेदवार म्हणून रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी मला जाहीर पाठींबा दिला. याबद्दल मी त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांसह आर.पी.आय.पक्षाचे आभार व्यक्त करतो, अशी प्रतिक्रिया डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

# राजेभाऊ तू काळजी करू नको

## दखल: शरद पवार यांचा राजेभाऊ फडांना ऊर्जादायी शब्द



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या प्रचारार्थ परळी वैजनाथ येथे भव्य जाहीर सभा घेतली. परळी विधानसभा मतदारसंघातील जनतेने या सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दुपारच्या सुमारास त्यांचं परळीत आगमन झालं. यावेळी युवक नेते राजेभाऊ फड यांनी हेलिपॅडवर उपस्थित राहून त्यांचे स्वागत केले. यावेळी शरदचंद्र पवार यांनी राजेभाऊ फड यांचा हात पकडत म्हटले की, राजेभाऊ तू संघर्ष करत रहा, काळजी करू नकोस मी आहे... असा विश्वास दिला.

देशाचे नेते, जाणते राजे शरदचंद्र पवार महाविकास आघाडीच्या प्रचारार्थ परळी वैजनाथ शहरात आले होते. त्यांचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी स्वतः हेलिपॅडवर उपस्थित राहून प्रभू वैद्यनाथ यांच्या पावन भूमीत स्वागत केले. यावेळी पवार साहेबांनी थोड्याच शब्दांत मोठी ऊर्जा दिली आणि मार्गदर्शन केले. ते मला म्हणाले... राजेभाऊ तुमच्यासारख्या तरुण तडफदार

पान २ वर...

# शाळा प्रवेश दिन उपक्रमाने उत्साहात

## धोरण: महामानव अभिवादन ग्रुप, वाचाल तर वाचाल तर्फे नियोजन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

७ नोव्हेंबर १९०० रोजी भीमराव रामजी आंबेडकर यांनी सातारा येथील सरकारी विद्यालयात इंग्रजी पहिल्या वर्गात प्रवेश घेतला होता, तो दिवस महाराष्ट्र शासन ७ नोव्हेंबर २०१७ पासून शाळा प्रवेश दिन, विद्यार्थी दिन म्हणून संपन्न करीत आहे. या दिनाचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने बलभीम नगर बुध्द विहार (शिवाजीनगर) येथे शाळा प्रवेश दिन, विद्यार्थी व पालकांसमवेत विविध उपक्रमाने संपन्न केला. या कार्यक्रमास से.नि. शिक्षणाधिकारी सखाराम उजगरे अध्यक्षपदी लाभले तर प्रमुख पाहुणे म्हणून से.नि.सीईओ जि.प. बनसोडे पी.व्ही, से.नि.उपनिबंधक सहकार हनुमंत कांबळे, प्राचार्य सुशील गायकवाड, प्रा.बबीता गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, ॲड.राजेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी करुन महामानव अभिवादन ग्रुप व वाचनालय राबवित असलेल्या उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड.तेजस वडमारे यांनी केले. सर्व प्रथम तथागतास पुष्प तर प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी व पालकांशी हितगुज साधतांना आयु.पी.व्ही.बनसोडे म्हणाले की, आजची तरुण पिढी इंटरनेट व मोबाईलच्या मायावी जगातून बाहेर पडून ग्रंथाच्या सहवासात राहून त्यांचे वाचन, चिंतन व मनन करुन माणसाशी माणसाने माणसासारखे वागणे गरजेचे आहे व तसे आचरणात आणणे आणि पालकांनी पाल्यांना लहानपणीच चांगल्या सवयी लावणे अत्यंत महत्वाचे असून पालकांनी आपली गरीबी शिक्षणाच्या आड येवू न देता पाल्यास सुसंस्कारीत करणे हाच खर्या अर्थाने शाळा प्रवेश दिन साजरा केला असे म्हणता येईल. या प्रसंगी प्रा.बबीता गायकवाड व हनुमंत कांबळे यांनी विद्यार्थ्यांना व पाल्यांना अत्यंत सोप्या भाषेत जीवनातील पाल्याचे कर्तव्य व विद्यार्थ्यांची जबाबदारी अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली. शिकून पुढे गेलेल्यांनी समाजाचे आपण काही देणे लागतो या भावनेने निस्पृहपणे काम केले पाहिजे या बद्दल आग्रही मत मांडले व त्याकरीता

पान २ वर...

# चांगल्या कामाची दखल घेतली जाते!

## एकनिष्ठ: राष्ट्रवादीकडून गुट्टे कुटुंबाला आभार पत्र

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

एक वचनी पक्षनिष्ठा ठेवणारे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जेष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे व त्यांचे पुत्र युवानेते सुनील गुट्टे यांना खा.शरदचंद्रजी पवार साहेबांनी एका पत्राद्वारे पक्षाला दिलेल्या प्रतिसादाबद्दल व तुतारीच्या गगनभेदी निनादात सौ.सुदामतीताई ,पुत्र सुनील गुट्टेंची मोलाची साथ ही अतुलनीय असल्याच्या आशयाचे पत्र पाठवले आहे.

खा.शरदचंद्रजी पवार साहेबांनी पक्षाच्या लेटरहेड वर नमुद केलेला मजकूर असा आहे की,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी हा आपला परिवार सर्व स्तरावर आपली छाप उमटवतो तो तुमच्यासारख्या कार्यकर्त्यांच्या जोरावरच! जनकल्याणाचे ध्येय पूर्ण होण्यासाठी आणि पक्षाशी प्रतारणा केलेल्या भूमिकेला तसूभरही न शिवता आपण पक्षासोबत आजही एकनिष्ठ आहात याबद्दल सर्वप्रथम अंतःकरणापासून आभार मानतो. लोकसभेच्या विजयात राज्यात



सर्वश्रेष्ठ पक्ष ठरवून तुम्हा सहका-यांनी दिलेल्या योगदानाने पक्षाच्या स्वाभिमानी प्रतिष्ठेला आणि विचारधारेला अधिक दृढ केले. त्यावेळी झालेल्या तुतारीच्या गगनभेदी निनादात तुमची मोलाची साथ ही अतुलनीय होती.आता विधानसभेच्या तयारीला लागताना आपल्या पक्षावरील विश्वास शेवटच्या घटकापर्यंत किती घट्ट झालाय याचा प्रत्यय तुम्ही साद केलेल्या विधानसभा निवडणुकीच्या इच्छुक अर्जामधून आला. इच्छुक अर्जाची हजारोंची संख्या ही लक्षणीय आहे. यासह तुमच्यासारख्या सहका-यांनी केलेल्या लोकसेवेच्या कामातून आपला पक्ष नेहमीच जनतेच्या विश्वासाला तडा जावू देत नाही हे अधोरेखित झाले.मात्र ज्याप्रमाणे लोकसभेला आपली कामगिरी जनतेने स्वीकारली तीच भूमिका ठेवून आपल्याला विधानसभेला सामोरे जावे लागेल, विधानसभेला दाखवलेल्या आपल्या भरघोस प्रतिसादाचा मान राखून आपली नोंद निश्चितच घेतली जाईल. मात्र मर्यादित जागांमुळे निवडक अर्ज स्विकारताना पक्षाचा प्रमुख या नात्याने मनाची प्रचंड तगमग झाली. आपल्या सर्वांच्या सहकार्यातूनच

पान २ वर...




# प्रशासनाकडून मतदान जनजागृती

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने २१३ हडपसर विधानसभा मतदार संघाचे वतीने निवडणूक निर्णय अधिकारी श्री.स्वप्नील मोरे यांचे मार्गदर्शनाखाली, तहसीलदार श्री.नागनाथ भोसले, नायब तहसिलदार जाई कोडें मॅडम यांचे नियोजनानूसार आज रोजी श्री महादजी शिंदे छत्री, वानवाडी येथे पर्यटक, कर्मचारी व परिसरातील नागरिकांना मतदानाची माहिती देण्यात आली व आगामी विधानसभा निवडणुकीत मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात आले. यास उपस्थिताकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी स्वीप टीम चे अमरदीप मगदूम, संजय परदेशीं, पंकज पालकूडतेवार, प्रशांत कोळेकर, पर्यटक, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# पुणे निवडणूक विभाग अलर्ट

## प्रशासन:निवडणूक खर्च निरीक्षकाची भेट

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

.निवडणूक आयोगाकडून, हडपसर विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक खर्च पर्यवेक्षक म्हणून नेमण्यात आलेले उमेश कुमार (आय.आर.एस.)-(सी अँड सी.इ.) यांनी हडपसर विधानसभा मतदारसंघाचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय - पुणे महानगपालिकेचे विठ्ठल तुपे नाट्यगृह, हडपसर, पुणे येथे भेट दिली.

१३- हडपसर विधानसभा मतदार संघ, आज खर्च पर्यवेक्षक उमेश कुमार (आय.आर.एस.)-(सी अँड सी.इ.) यांच्या प्रमुख उपस्थितीत व डॉ. श्री.स्वप्नील मोरे, मा.निवडणूक निर्णय अधिकारी, यांचे अध्यक्षतेखाली सर्व १९ उमेदवारांची प्रथम खर्च तपासणी पार पडली सदर तपासणी दरम्यान




मा.जिल्हा समन्वय अधिकारी - महेश सुधळकर, मा.सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी - नागनाथ भोसले, मा.सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी - अमोल पवार, मा.नायब तहसीलदार श्रीमती जाई कोंडे तसेच सर्व विभागाचे नोडल अधिकारी, सहायक खर्च निरीक्षक - श्रीमती सुषमा पाटील व राकेश रंजन तसेच सहाय्यक खर्च निरीक्षक (जिल्हा स्तरीय) - श्री.विकास खामकर व श्री. सुभाष पाडेकर आणि श्रीमती वनिता बाविसकर, नोडल अधिकारी - उमेदवार खर्च ताळमेळ समिती, उमेदवार खर्च ताळमेळ

पान २ वर...

# निवडणूक कामाचा घेतला आढावा

## अलर्ट: माध्यम कक्षास अविनाश पाठक यांची भेट



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात माध्यम कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या माध्यम कक्षास जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष अविनाश पाठक यांनी आज भेट दिली. तसेच कक्षामध्ये सुरू असलेल्या जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज, मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व समाज माध्यमांच्या कामकाजांचा त्यांनी आढावा घेतला व मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणार्थी

पान २ वर...

## निर्णय — रोहन गलांडे, मदनलाल परदेशी आक्रमक

# सव्वा रुपयाच्या अब्रुनुकसानीचा दावा देणार

केज/पुण्यभूमी प्रतीनीधी

केज मतदार संघात सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा यांनी गेल्या वर्षभरात जे कांड आणि कारस्थान केले त्यात उंदरी येथील संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचे समर्थक सेवक यांना अरे रावी ची भाषा करणे तसेच मतदार संघातील जनतेची सत्य बाजू मांडणारे पत्रकार रोहन गलांडे यांच्यावर केज येथे खोट्या केसेस करणे धमक्या देणे हे सत्र सातत्याने चालू आहे याला वैतागून माननीय न्यायालयात रोहन गलांडे त्यांच्यावर अब्रू नुकसानीचा सव्वा रुपयाचा दावा करणार आहे तसेच अंबाजोगाई येथील जोगाईवाडी येथील शिवसेना नेते उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे



विधानसभा प्रमुख व माजी तालुकाप्रमुख यांनी वरपगाव येथील पार्वती बाई जगताप यांना सहकार्य केल्यामुळे जोगाईवाडीचे सरपंच पती राष्ट्रीय यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घेणारे बालासाहेब दोडतले यांनी अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनला मदन परदेशी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला की मदन परदेशी वर नंदकिशोरजी मुंदडा साहेब शंभर कोटी रुपयाचा अब्रूनुकसानीचा दावा व शंभर कोटी रुपयांचा दावा असा दोन्ही मिळून दोनशे कोटी रुपयाचा दावा दाखल केला आहे असे म्हटले आहे म्हणून दोघांवर मदनलाल परदेशी वर खोटी केस दाखल केली म्हणून सव्वा रुपयाचा दावा दाखल करणार असे मदन परदेशी यांनी सांगितले मागे महापुरुषांच्या सोबत ग्रामपंचायत जोगावाडी कार्यालयात मध्ये मुंदडा कुटुंबाचे फोटो लावले होते त्याच्यावर आवाज उठून महापुरुषाच्या शेजारी लावलेले फोटो काढण्यास भाग पाडले त्यावर त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्याला सांगून ऑनलाइन व पोस्टर द्वारे मदन परदेशी व त्याची साथीदार ही खंडणी मागत असल्याचे तक्रार केली असेच खोटे नाटे गुन्हे दाखल करीत आहेत सत्तेचा दुरुपयोग करून सामाजिक कार्यकर्त्यांना वेठीस धरणे त्याची गळचीपी करणे व मुस्कटदाबी करणे हा शेठजीचा हातखंडा आहे असेच नाना प्रकारचे उद्योग ते करत असतात या सर्व प्रकाराला वैतागून मदन परदेशी व रोहन गलांडे पाटील त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केल्यामुळे ते फार गरीब आहेत म्हणून सव्वा रुपया दंडाची आकारणी करण्याचा दावा करण्याच्या तयारीत आहोत असे मदनलाल परदेशी व रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

# माजलगावमध्ये वंचितची आज सभा

## इंजि.प्रशांत उघडे:ऐतिहासिक सभेचे साक्षीदार व्हावे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी होऊ घातलेल्या विधानसभा च्या रणधुमाळीत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एडवोकेट बाळासाहेब आंबेडकर यांची जाहीर सभा दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी एक वाजता माजलगाव शहरातील मोंढा मैदान या ठिकाणी होणार आहे . हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावून एल्गार महासभा यशस्वी करण्याचे आव्हान वंचित बहुजन आघाडी धारूर तालुका अध्यक्ष इंजि. प्रशांत उघडे यांनी केले आहे.

वंचित बहुजन आघाडी माजलगाव मतदार संघाचे अधिकृत उमेदवार माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्या प्रचारार्थ बाळासाहेब आंबेडकर



यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे आदरणीय बाळासाहेब आंबेडकर विधानसभा निवडणुकीच्या अगोदर संबंध महाराष्ट्रभर फिरून आरक्षण बचाव यात्रेच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधत होते. ही निवडणूक एससी, एसटी,ओबीसी, अल्पसंख्याक समाजाच्या दृष्टीने देखील देखील महत्त्वाची आहे. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये एससी एसटी आणि ओबीसी मुस्लिम समुदायाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी बाळासाहेब आंबेडकर यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेली आहे ही संधीचे सोने करण्याचे आपली सर्वांची जबाबदारी आहे. आपले हक्काचे प्रतिनिधी जर विधिमंडळात गेले नाही तर एससी एसटी त्याचबरोबर ओबीसीचे आरक्षण देखील धोक्यात येईल. झुंड शाईच्या माध्यमातून इथल्या एससी

पान २ वर...